# जीवनविद्येचा दीपस्तंभ

जुलै २०२२




प्रत्येक कृती ही राष्ट्रहिताची, विश्वशांतीची

जीवनविद्येचा ई दीपस्तंभ जुलै २०२२
वर्ष १ ले    अंक ८ वा

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | संपादकीय | ३ |
| २ | सिंचन ज्ञानामृताचे | ४ |
| ३ | प्रल्हाद वाणी | ८ |
| ४ | कोर्स शेड्युल | ११ |
| ५ | पर्यावरण हाच नारायण | १२ |
| ६ | काय दिलेस मज तू ... | १६ |
| ७ | बालकट्टा (खास बालकांसाठी ) | १९ |
| ८ | मन मंदिरा, संस्कारांची संगत | २१ |
| ९ | प्रश्न तुमचे उत्तर श्री प्रल्हाददादांचे | २२ |
| १० | जीवनपरिपूर्ण | २३ |
| ११ | स्त्रियांनी केलेली क्रांती | २४ |



संपादिका: सौ. शिल्पा ढगे, बी.ए.

**सहसंपादक:** डॉ. सौ. प्रभा मोदी. *M.S. (Mumbai), F.R.C.S. (England),* श्री. अरविंद चौधरी. *ICWA, M.Com., B.A.*

**मुद्रक : प्रकाशक : सौ. शिल्पा ढगे** यांनी जीवनविद्या मिशन, मुंबई यांच्यासाठी,
जीवनविद्या मिशन, 'भक्तियोग', २८ए, दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी, मुंबई- ४०० ०३३, **दूरध्वनी :** २४७०८७८२, येथून प्रसिद्ध केला.

**बोरीवली प्रशासकीय कार्यालय :** ए-२, सिद्धार्थ नगर बि.क्र.५ को.ऑप.हौसिंग सोसायटी, धीरज उपवन समोर,
पश्चिम द्रूतगती मार्गाजवळ, बोरीवली (पूर्व), मुंबई - ४०० ०६६. **दूरध्वनी :** २८८७९०१५-१६

www.jeevanvidya.org Email: kalachowkyoffice.com



| कार्यकारी मंडळ | मुखपृष्ठ संकल्पना | सहकार्य |
|---|---|---|
| श्री. ए. जी. बेळवेकर<br>श्री. सतिश पंडित<br>सौ. अनिता मोरे | श्री. विठ्ठल घाडी<br>श्री. कृष्णकांत पाळेकर | रेश्मा करबेले, अपर्णा केळकर,<br>कांचन पालव, स्वाती संदानसी<br>मनिष चव्हाण<br>जीवनविद्या आयटी टीम |

SUBSCRIBE US ON @ JEEVANVIDYAMISSION www.youtube.com/JeevanvidyaMission
LIKE US ON @ JEEVANVIDYAMISSION www.facebook.com/Jeevanvidya
FOLLOW US ON @ JEEVANVIDYA www.twitter.com/Jeevanvidya
FOLLOW US ON @ JEEVANVIDYAOFFICIAL www.Instagram.com/JeevanvidyaOfficial



# संपादकीय

जुलै महिन्यात साधकांना वेध लागतात ते गुरुपौर्णिमेचे! गुरुपौर्णिमा महोत्सव म्हणजे जीवनविद्या परिवाराचा कृतज्ञता महोत्सव! जीवन सुखी, समाधानी आणि यशस्वी करण्यासाठी लागणारे ज्ञान ज्या सद्‌गुरूंनी दिले त्यांना गुरुदक्षिणा देण्याचा सोहळा म्हणजे गुरुपौर्णिमा!

इतर गुरुंनी आपल्याला दिलेले ज्ञान लौकिकार्थाने आपले जीवन घडवीत असतेच, जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारे ज्ञान देणाऱ्या त्या सर्व गुरुंना आदरपूर्वक नमस्कार. पण सद्‌गुरूंनी दिलेल्या ज्ञानामुळे आपण जीवनमुक्त होतो. "सहज असणारा परमेश्वर सहज कसा पहायचा हे सहज शिकवितात ते खरे सद्‌गुरू" असा जीवनविद्येचा एक अमृत तुषार आहे. खरा परमेश्वर आहे का ? आणि आहे तर ओळखायचा कसा? या आणि अशा अनेक गहन प्रश्नांची उत्तरे वैज्ञानिक दृष्टिकोनातून देणारे 'शाब्दे परेची निष्णात' असे सद्‌गुरू श्री वामनराव पै! जीवन जगण्याची कला शिकविणारे ज्ञान फक्त आपल्या शिष्यांनाच नाही तर संपूर्ण जगाला देणारे निरपेक्ष सद्‌गुरू! आणि त्यांना अपेक्षित असलेली गुरुदक्षिणा त्यांच्या निरपेक्षपणाचेच द्योतक. 'तुम्ही सुखी व्हा आणि इतरांना सुखी करण्याचा प्रयत्न करा'. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने आज या अनोख्या गुरुदक्षिणेचा पुनर्उल्लेख!

जागतिक स्तरावर, राष्ट्रीय स्तरावर आणि राजकीय वर्तुळात कितीही स्थित्यंतरे आली तरी सामान्य माणसाच्या जीवनात फार मोठा फरक पडत नाही. जीवन हे न संपणारे युद्ध आहे आणि ते लढतच रहावे लागते. थांबला तो संपला! आणि ज्याचे युद्ध त्यालाच लढावे लागते. निसर्गसुद्धा आपल्याला हेच शिकवित असतो. कोषातून बाहेर पडण्याची धडपड करणाऱ्या फुलपाखराची आपल्याला किती जरी दया आली तरी आपण त्याला मदत करू शकत नाही. उलट आपल्या मदतीने त्याचे जीवन संपुष्टात येईल! 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' हे लक्षात ठेवले की आपण त्यानुसार मानसिक तयारी ठेवतो आणि आल्या प्रसंगाला धैर्याने तोंड देऊ शकतो.

अपरिहार्य असणाऱ्या या जीवनयुद्धाला तोंड देण्यासाठी आणि त्यात यशस्वी होण्यासाठी गरज असते ती शहाणपणाची! हे शहाणपण केवळ ज्ञानातून निर्माण होते. याची जाणीव ज्यांना असते ते योग्य मार्गदर्शन मिळविण्यासाठी प्रयत्न करतात. अशा जिज्ञासू लोकांसाठी जीवनविद्या मिशन आयोजित विविध उपक्रम सहाय्यक ठरतात. जीवनयुद्धात सहज विजय प्राप्त करून देण्यासाठी सर्वतोपरी मदत करतात. यातीलच एक अतिशय महत्त्वाचा उपक्रम म्हणजे जीवनविद्येचे कोर्सेस. लॉकडाऊन नंतर पुन्हा सुरू झालेल्या या उपक्रमाला उदंड प्रतिसाद मिळत आहे. कारण कोविड-१९ च्या प्रभावाने अनेक लोकांना समजून चुकले आहे की जीवन आनंददायी करण्यासाठी फक्त पैसा उपयोगाचा नाही. त्यासाठी अजून काही तरी लागते. हे अजून काही तरी म्हणजे नेमके काय? हे या कोर्सेसला आल्यानंतर समजते. आणि हीच लोकं माऊथ पब्लिसिटी करुन त्यांच्या परिवाराला, मित्रमैत्रिणींना या कोर्सेससाठी पाठवतात. कोर्सेसचे नियोजन करणाऱ्या आणि त्यासाठी व्यवस्था निर्माण करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना आणि व्याख्यात्यांना मनापासून धन्यवाद आणि कार्यासाठी शुभेच्छा!!

सर्व वाचकांना दीपस्तंभ आणि जीवनविद्या परिवारातर्फे गुरुपौर्णिमेच्या मनःपूर्वक शुभेच्छा!




प्रत्येक माणसाला सुख हवे असते. यश व समृद्धी ही सुद्धा सुखाकडे नेते. यश मिळाले की सुख होते. समृद्धी मिळाली कि सुख होते. शेवटी सुख हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे. पण तो हक्क आपल्याला मिळतोच असे नाही. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे असे लोकमान्य टिळकांनी सांगितले पण ते मिळाले होते का? स्वातंत्र्य आपल्याला मिळाले नव्हते आपण पारतंत्र्यात होतो. टिळकांनी गर्जना करून सांगितले, "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे." व तो मला मिळालाच पाहिजे. स्वराज्य हा आपला जन्मसिद्ध हक्क असूनसुद्धा तो सहज मिळालेला नाही. त्यासाठी चळवळी कराव्या लागल्या, सत्याग्रह करावा लागला, किती तरी क्रांतीकारकांना आपले जीवन राष्ट्रासाठी अर्पण करावे लागले. कित्येकांची मुले वाऱ्यावर पडली कारण त्यांनी आपले जीवन राष्ट्रासाठी अर्पण केले होते. आज ही भावना लोकांमध्ये आहे का? सत्ता कशी मिळेल? संपत्ती कशी मिळेल? याकडे लोकांचे लक्ष आहे. राष्ट्राचा विचार कुणी करीत नाही.

सुख हा आपला जन्मसिद्ध हक्क असूनसुद्धा ते मिळविण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. चळवळ करायला पाहिजे. ती चळवळ का करायची? कशी करायची? हे जीवनविद्या सांगते. चळवळ करणे व वळवळ करणे या फरक आहे. एखाद्या ध्येयासाठी आपण प्रयत्न करतो तेव्हा त्याला चळवळ असे म्हणतात. सुख हे आपले ध्येय आहे. त्यासाठी नेमके काय करायचे हे समजून घेतले नाहीतर ती चळवळ फुकट जाते, उगाच कष्ट होतात व ती वळवळ ठरते.

जीवनविद्या सांगते, तुम्हांला सुख पाहिजे तर पुण्य आवश्यक आहे. पुण्याला पर्याय नाही. दुःख मिळते त्याला कारण पाप. आज पाप व पुण्य ह्या दोन्ही संकल्पना बोथट झालेल्या आहेत. चलनी नाणी वापरून गुळगुळीत होतात व त्यांना काही किंमत नसते तसे पापपुण्य ह्या संकल्पना बडबड करून इतक्या बोथट झालेल्या आहेत. त्यामुळे लोक म्हणतात, कसले पाप व कसले पुण्य! पापपुण्याच्या चुकीच्या कल्पना काय आहेत व पापपुण्याच्या खऱ्या संकल्पना काय आहेत हे लोक लक्षात घेत नाहीत. परमेश्वराबद्दल तसेच झालेले आहे. आज लोक ज्याला परमेश्वर म्हणतात तो व खरा परमेश्वर यात जमीन अस्माना इतके अंतर आहे. केवळ हिंदुस्थानातले लोक नव्हे तर जगभरातले लोक ज्याला परमेश्वर म्हणतात तो आणि खरा परमेश्वर यात जमीन अस्माना इतके अंतर आहे. तसेच पापपुण्याचे आहे.

आपण ज्याला पाप म्हणतो ते पाप असतेच असे नाही व ज्याला पुण्य म्हणतो ते पुण्य असतेच असे नाही. ह्यासाठी तीन गोष्टी मी सांगितल्या. तुकाराम महाराज काय म्हणतात, रामदास स्वामी काय म्हणतात व जीवनविद्या काय सांगते. तुकाराम महाराजांनी एका वाक्यात सांगितले, "पुण्य ते परोपकार व पाप ते परपीडा" रामदास स्वामी म्हणतात, "पुण्य ते ईश्वर स्मरण, पाप ते विस्मरण" जीवनविद्या सांगते, "कृतज्ञता हे पुण्य व कृतघ्नता हे पाप" ह्या तीनही संकल्पना समजून घेतल्या पाहिजेत.

तुकाराम महाराज काय म्हणतात, "पुण्य ते परोपकार व पाप ते परपीडा" याचा अर्थ असा तुम्ही दुसऱ्यांना पिडा देता म्हणजे ते पाप आहे. सासू सुनेला छळते ते पाप आहे. सासू सुनेचे दोष काढते. असलेले व नसलेले! ते पाप आहे. फक्त दोषच पहायचे व गुणांकडे दुर्लक्ष करायचे ते पाप आहे. सासू सुनेची इतरांकडे निंदा करते ते पाप आहे. तसेच सून सासूला छळते ते पाप आहे. सून सासूचे दोष काढते, इतरांकडे निंदा करते ते पाप आहे.

आज सर्व माणसांचे जीवन पाहिले तर सर्व ठिकाणी महाभारत आहे. महाभारत का घडले? भावाभावांमध्ये भांडणे झाली. ते एकच कुटुंब होते. कौरव व पांडव ! पांडव हे खरे तर कौरवच होते. कौरव व पांडव ह्या भावाभावांमध्ये भांडणे झाली. ती इतकी थराला गेली की शेवटी युद्ध झाले. किती भाऊ मारले गेले, त्यांची किती मुले मारली गेली, किती बायका विधवा झाल्या, किती जखमी झाले. हे कशामुळे झाले? पापपुण्याच्या संकल्पना माहित नाहीत, शहाणपण कशात आहे हे माहित नाही, जीवन कसे जगावे हे ठावूक नाही, जीवन जगण्याची कला ठावूक नाही. हे महाभारत प्रत्येक घरात घडते आहे. हे कशामुळे घडते? शहाणपण नाही. शहाणपण कशात आहे? पाप पुण्याच्या संकल्पना समजून घेण्यात शहाणपण आहे. शहाणपण कशात आहे ? हे निरनिराळ्या प्रकारे सांगता येईल. पण याठिकाणी हा विषय पापपुण्याच्या संदर्भात पाहूया. पाप कशाला म्हणतात व पुण्य कशाला म्हणतात हे समजून घेवून त्याप्रमाणे आचरण केले पाहिजे.

आज लोकांमध्ये सतत भांडणतंटे, कोर्ट कचेऱ्या, प्रॉपर्टीची नासधूस चाललेली असते. एकमेकांचे दोष पहाणे, एकमेकांची निंदा नालस्ती करणे हेच राजकारण झालेले आहे. मी नेहमी सांगतो, राजकारण कशाला म्हणतात. "राज्य सुरळीत चालण्यासाठी जे करणे आवश्यक आहे ते करणे म्हणजे राजकारण" राजकारण म्हणजे खेचाखेची नव्हे, याला पाड, त्याला पाड याला राजकारण नाही म्हणत. तुम्हांला सत्ता दिली ती लोकांनी दिली तेव्हा तुम्ही लोकांचे सेवक आहात हे पहिले लक्षात ठेवले पाहिजे. काही लोक स्वत:ला सत्ताधीश समजतात. पण लोकांनी ही सत्ता आपल्याला दिलेली आहे व आपण त्यांचे सेवक आहोत, जनतेची सेवा करणे हे माझे कर्तव्य आहे व ह्या कर्तव्यधर्माचे मी जर पालन केले नाहीतर ते पाप आहे हे सतत लक्षात ठेवायला हवे..

जीवनविद्या सांगते पापपुण्याची संकल्पना समजून घेवून ती जीवनात उतरवणे म्हणजे शहाणपण! तुम्ही action केली की reaction होते. क्रिया केली की प्रतिक्रिया होतेच. पुष्कळ वेळेला क्रिया होते पण प्रतिक्रिया



लगेच होत नाही. अशा वेळेला काय होते? त्या क्रियेची प्रतिक्रिया होत नाही तोपर्यंत ती पापपुण्य ह्या स्वरूपात अंतर्मनाच्याद्वारे हृदयातील बँकेत ज्याला 'दिव्य बँक' असे म्हणतात तिथे जमा होते.

ह्याची प्रोसेस अशी आहे action झाली की सूक्ष्म जाणीवेवर तिचे ठसे उमटतात. व हे उमटलेले ठसे अंतर्मनाच्याद्वारे Divine बँकेत जमा होतात. ही Divine Bank हृदयात आहे म्हणजे खोल जाणीवेमध्ये आहे. विहिरीत खोल पाणी असते. ती तळाला खूप खोल असते तसे ह्या जाणीवेत खूप खोल असलेल्या Divine बँकेत हे ठसे जमा होतात व प्रगट होण्यासाठी अनुकूल संधीची वाट पहातात. तुम्ही नको नको त्या गोष्टी करता म्हणजे पाप करता तेव्हा जमा झालेल्या पापाला वर येण्यास संधी मिळते आणि तुम्ही चांगल्या गोष्टी करता म्हणजे पुण्य करता तेव्हा जमा झालेल्या पुण्याला वर येण्यास संधी मिळते. तुम्ही जे काही करता त्यावर पापाने किंवा पुण्याने वर यायचे कि खाली रहायचे ते अवलंबून आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे संगती महत्वाची आहे. संगतीप्रमाणे पाप किंवा पुण्य वर येते. वाईट लोकांची संगती मिळाली की पाप वर येते व पुण्य खाली रहाते. आणि चांगल्या लोकांची संगती मिळाली की पुण्य वर येते व पाप खाली रहाते. ते Laboratory मध्ये सिद्ध करता येत नाही. जीवनाच्या Laboratory मध्ये ते सिद्ध होत असते, अनुभवाला येत असते. पण ते कशामुळे झाले हे लोकांच्या लक्षात येत नाही. लोक म्हणतात, देवाचा कोप झाला, कुलदेवतेचा कोप झाला, मुळ पुरुषाचा रोष झाला. ह्याला मुळपुरुष कोण हे माहित नाही. कुणीतरी बुवाबाबा सांगतो व हा खरे मानतो, दुसरे कुणीतरी सांगतो, करणी केली, मूठ मारली. आणखी कुणीतरी सांगतो, तीर्थयात्रेला गेला नाहीत. पण हे सगळे खोटे आहे. करणी केली, मूठ मारली हे सांगून ते तुमच्या मनात भिती निर्माण करतात व त्याचा पुरेपूर फायदा ते लोक घेतात.

तुम्ही लोकांना त्रास देता, लोकांचा छळ करता तेव्हा ते पाप आहे आणि तुम्ही लोकांसाठी चांगल्या गोष्टी करता, मदत करता तेव्हा ते पुण्य आहे. जीवन म्हणजे काय ? हे एका वाक्यात सांगायचे तर “पाप पुण्यांचा हिशोब चुकता करणे म्हणजे जीवन”

मी मागल्या खेपेस सांगितले, पुण्य खर्ची टाकता तेव्हा चांगले जीवन प्राप्त होते म्हणून खर्च केलेले पुण्य भरून काढले पाहिजे. पण लोक पाप भरून काढत असतात. सहज दुसऱ्याची निंदा करतात. तिथे पाप करतो हे लोकांना ठावूकच नसते. जो हजर असेल त्याबद्दल कोणी काही बोलणार नाही पण जो हजर नसेल त्याची निंदा करतात. सून ऑफिसला गेली की सासू तिची निंदा इतरांकडे करते. भाऊ भाऊ एकमेकांची निंदा करतात. तुमच्या घरातल्या गोष्टी तुम्ही इतर लोकांकडे कशाला सांगता? ते काय करणार? ते मजा बघणार. दोघांचेही हसे होते. लोकांना सांगून तुमचे प्रश्न सुटणार नाहीत. लोक काही सांगणार नाहीत. तुम्हांला सांगतील ते फक्त सद्गुरू, तेसुद्धा खरे सद्गुरू! खोटे सद्गुरू काय सांगतील, अमुक करा तमुक करा. अभिषेक करा. कर्मकांडे करायला लावतील व तुमच्या पाठीमागे नको ती लष्टकं लावतील. खरे सद्गुरू तुम्हाला अचूक मार्गदर्शन करतील. डॉक्टरकडे गेल्यावर त्याने अचूक Dignosis केले तर ठीक

आणि चुकीचे Dignosis केले तर रोगी दगावण्याची शक्यता असते. सद्गुरूंनी जर चुकीचे मार्गदर्शन केले, कर्मकांडे करायला सांगितली तर तुमचे प्रश्न सुटण्याऐवजी जास्त चिघळतील. पण खरे सद्गुरू Dignosis अचूक करतात व शिष्याने त्याप्रमाणे केले कि त्याला फळ मिळते म्हणून,

सद्गुरू वाचोनी सापडेना सोय।
धरावे ते पाय आधी आधी।।
आपणासारिखे करीते तत्काळ।
नाही काळवेळ तया लागी।।
लोह परिसाची न साहे उपमा।
सद्गुरू महिमा अगाध।।
तुका म्हणे कैसे आंधळे हे जन।
गेले विसरोनी खऱ्या देवा।।

सद्गुरू हा खरा देव असे म्हटलेले आहे. खऱ्या सद्गुरूंमध्येच तुमच्या जीवनातले प्रश्न सोडविण्याचे सामर्थ्य असल्यामुळे प्रश्न विचारायचेच झाले तर त्यांना विचारावे. लोकांचे हसे करून घ्यायचे कि तुमच्या जीवनातले प्रश्न सोडवून यशस्वी व्हायचे आहे हे तू ठरव. कारण "तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार".













प्रल्हादवाणी ....५

दृष्टी समतेची - भाग ३

श्री सद्‌गुरूंशी ज्ञानाची पाईपलाईन जोडण्यासाठी सद्‌गुरूंचे प्रवचन ऐकताना त्यांच्या आसनासमोर खाली बसायचे असते. सद्‌गुरूंच्या ज्ञानाचा प्रवाह आपल्याकडे वहाण्यासाठी आपण त्यांच्यासमोर खाली बसले पाहिजे म्हणजेच आपला अहंकार कमी असला पाहिजे. सद्‌गुरूपेक्षा मी मोठा असे म्हटले तर कधीच ज्ञान प्राप्ती होणार नाही. सद्‌गुरूंकडे येताना अहंकार आणि अभिमानाचे जोडे बाहेर काढून यायचे असतात. अहंकारामुळे आपल्या जवळची माणसे गमावण्यापेक्षा आपल्या माणसांसाठी अहंकार गमावलेला बरा!

सकाळी 'मानसपूजा' आणि 'सद्‌गुरू महिमा अगाध' या विषयांवरील प्रबोधन ऐकत सद्‌गुरूंचे चरण धरणे आणि संध्याकाळी सद्‌गुरूंच्या मार्गदर्शनाप्रमाणे आचारण कसे करावे हे शिकणे हा तोल आपण गुरुपौर्णिमेनिमित्त साधत आहोत. आपला अहंकार कमी करण्यासाठी समता, सभ्यता, सामंजस्य, सहिष्णुता, समाधान आणि कृतज्ञता या सहाही गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. मानवी संस्कृतीची ही सहा मूल्ये आपण जपली तरच आपण जीवनविद्या जगू शकतो. मी एक कविता केली त्यात 'जीवनविद्या ही जगायची असते' असे म्हटलेले आहे. जीवनविद्या ही नुसती ऐकायची नसते नुसती बोलायची नसते तर ती जगायची असते. 'जीवनविद्या ही जगण्याची कला आहे' असे आपण म्हणतो तेव्हा जीवन जगायचे म्हणजे काय? तर जीवनात माणसे जोडायची. आपल्याला जर आयुष्यात यशस्वी व्हायचे असेल तर माणसे जोडणे महत्त्वाचे आहे. माणसे जोडल्याशिवाय आपण जीवनात सुखी, समाधानी, यशस्वी होवूच शकत नाही.

माणसे जोडणे म्हणजेच मने जोडणे. समता, सभ्यता, सामंजस्य, सहिष्णुता, समाधान आणि कृतज्ञता या सहा गोष्टींनी मने जोडली जातात. जेवढी मने जोडली जातील तेवढे आपण आतून मोकळे होत जातो. मुक्त होण्याआधी मोकळे होणे आवश्यक असते.

मनात गोंधळ नसतो तेव्हाच माणसाला समाधान आणि शांती मिळते. समाधान आणि शांती मिळणे म्हणजे सुखी होणे. बाहेरील गोंगाटाचा आपल्याला जसा त्रास होतो तसा आपल्या आत चाललेल्या गोंगाटाचा आपल्याला त्रास होतो. अहंकार हा आत गोंगाट करत असतो. द्वेष, मत्सर, तिरस्कार या सर्वांचाच आत गोंगाट चालू असतो आणि त्यामुळे आपल्याला शांती मिळत नाही. आपल्याला जर शांती हवी असेल तर मोकळे व्हायला शिकले पाहिजे. समता, सभ्यता, सामंजस्य, सहिष्णुता, समाधान आणि कृतज्ञता ही मूल्ये जपली तरच आपल्याला मोकळे होता येईल. हे सर्व सहा पैलू एकमेकांशी जोडलेले आहेत.

समता म्हणजे समदर्शन. प्रत्येकाकडे माणूस म्हणून पहाण्याची दृष्टी ठेवावी. प्रथम त्याच्याकडे माणूस म्हणून बघ. नंतर ती एक व्यवस्था म्हणून बघ. 'व्यवस्था तिथे परमेश्वर' म्हणून त्याच्याकडे परमेश्वर म्हणून बघ असे आपल्याला सद्‌गुरूंनी शिकवलेले आहे. सभ्यता म्हणजे माणुसकीने वाग. प्रथम माणूस म्हणून बघ आणि माणुसकीने वाग या दोन गोष्टी म्हणजेच समता आणि सभ्यता. प्रेम, जिव्हाळा, आदर यालाच माणुसकी म्हणतात. एकमेकांवर प्रेम करणे एकमेकांबद्दल

जिव्हाळा, आदर असणे म्हणजेच माणुसकी. आज माणूस माणुसकी विसरलेला आहे. सद्गुरू म्हणतात परमेश्वर एक पायरी खाली उतरला तो झाला माणूस आणि माणूस स्वत:ला विसरला तो झाला पशू. आज माणसे पशूसारखे वागत आहेत. प्रत्येकाच्या आत एक पशू दडलेला आहे आणि पशुपती सुद्धा दडलेला आहे. माणसाच्या मनातला पशू जागा झाला की तो एक पायरी खाली उतरलेला असतो आणि पशूपती जागा असतो तेव्हा तोच माणूस इतरांना आवडायला लागतो. अहंकार पातळ होणे म्हणजेच अहंकार कमी कमी होत जाणे. अहंकाराच्या विरुद्ध शब्द नम्रता. अहंकारी माणूस आणि नम्र माणूस ह्यांत फरक आहे. नम्रता व कृतज्ञता वाढू लागली की अहंकार आपोआप कमीकमी होत जातो. सर्व आहेत म्हणून मी आहे आणि सर्वांच्या पुण्याईने मी जगतो आहे हे कळू लागते तेव्हा अंहकार कमी होत जातो. सद्गुरू सांगतात, "दुसऱ्याचा अहंकार जपा आणि स्वत:चा अहंकार चेपा यात दुसऱ्याचा अहंकार जपणे म्हणजे सभ्यता आणि स्वत:चा अहंकार चेपणे म्हणजेच नम्रता हे लक्षांत ठेवायचे. नम्र माणूस सर्वांना आवडतो तर अहंकारी माणूस कोणालाच आवडत नाही. सभ्यता आणि नम्रता हे माणुसकीचे दोन भाग आहेत.

सामंजस्य हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. समज गैरसमज हाच मानवी जीवनांतला सर्वात बिकट प्रश्न आहे. सामंजस्य नसल्यामुळे गैरसमज निर्माण होतात. दुसऱ्याला समजून घेतले तर गैरसमज दूर होतील. जगातील सर्व समस्या ह्या आपल्या चटकन दिलेल्या प्रतिक्रियांमुळे निर्माण होतात. आपल्या जीवनात कुठलीही घटना घडली, कुणीही तुमच्याशी बोलायला आला की तुम्ही त्यावर React कसे होता ह्यावर सगळे अबलंबून आहे. अमेरिकन फिलॉसॉफर स्टीफन कोवे ह्याने आपल्या 'seven habits of highly effective people' ह्या पुस्तकात '90/10 principal' लिहिलेले आहे. १० टक्के घटना ह्या 'happen to us' ह्या प्रकारच्या असतात आणि नव्वद टक्के घटना आपण त्या घटनांना कसे हाताळतो कसे react करतो ह्यावर अवलंबून असतात. उदा. एखाद्याने आपला अपमान केला. अपमान एकदाच झालेला असतो त्यावेळी तर आपण त्याच्याशी भांडतोच पण तीच गोष्ट पन्नास लोकांना सांगतो तेव्हा आपण आपली शक्ती किती वाया घालवतो. Action ला लगेच Reaction न देता Response दिला पाहिजे. Reaction & Response ह्यांत फरक आहे. लगेच प्रतिक्रिया न देता थोडे थांबून, विचार करुन प्रतिसाद देणे म्हणजे response. क्रिया आणि

अवयवदान अभियान
महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य व विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समिती
(ZONAL TRANSPLANT CO-ORDINATION CENTRE, MUMBAI)
चला, अवयवदानाचा संकल्प करूया, ऋण समाजाचे फेडूया
आतापर्यंत १२००० + लोकांनी अवयवदानाची नोंदणी केली आहे


Donate Organs, Live Forever
Zonal Transplant Coordination Centre Mumbai
donateorgan@jeevanvidya.org
संपर्क: प्रमोद रासम
९३२३५५२८९८

प्रतिसाद ह्यातला वेळ जितका वाढेल तितके तुमचे सामंजस्य आणि सहिष्णुता वाढेल.

जगांत दोन प्रकारची माणसे आहेत. काही जण विचार न करता कृती करतात तर काही जण फक्त विचारच करत रहातात, कृती करत नाहीत. आपल्याला आपल्यातील सामंजस्य वाढविण्यासाठी एक गोष्ट केली पाहिजे ती म्हणजे कुठल्याही घटनेला लगेच प्रतिक्रिया द्यायची नाही. आपल्याकडे दुसऱ्याचे म्हणणे ऐकून घेण्याची क्षमता असली पाहिजे. दुसऱ्याचे बोलणे पूर्ण होण्यापूर्वीच आपण बोलतो. दुसरे म्हणजे आपल्याला जे पाहिजे तेच आपण ऐकतो. सामंजस्य वाढविण्यासाठी आपले ऐकणे सुधारले पाहिजे. आपण जेव्हा दुसऱ्याचे पूर्ण ऐकून घेतो तेव्हाच आपण त्याला पूर्ण समजू शकतो. संवाद साधत असताना त्यात content आणि intent असतो. शब्द आणि हेतू ह्याद्वारे आपला संवाद चाललेला असतो. शब्दांपेक्षा हेतूला जास्त महत्व असते. आपण बोलताना उच्चारले जाणारे शब्दध्वनी आणि देहबोली ह्यातूनही हेतू कळतो. एखाद्या व्यक्तीच्या देहबोलीतून प्रेम कि राग व्यक्त होतो आहे हे कळते म्हणून संवाद साधताना देहबोलीला खूप महत्व आहे. आपले बोलणे आणि ऐकणे ह्या दोन्ही गोष्टी सुधारल्या की माणूस समंजस होतो. सद्गुरू सांगत की माझे प्रवचन ऐकताना जीवाचा कान करून ऐका म्हणजे सगळा जीव ऐकण्यात आणा. सद्गुरूंना पहात पहात त्यांना आपल्याला काय सांगायचे आहे हे समजून घेत ऐकणे म्हणजे जीवाचा कान करून ऐकणे. दुसऱ्याचे बोलणे ऐकताना आपण पूर्वग्रह ठेवून ऐकतो ह्यासाठी आपले ऐकणे सुधारले पाहिजे. ऐकणे आणि बोलणे ह्यातून गैरसमज निर्माण होतात म्हणून बोलताना ही सावधपणे बोलले पाहिजे कारण आपल्या बोलण्याने कोण दुखावला जाईल हे सांगता येणार नाही. आपण कुणाबद्दल गैरसमज करून घ्यायचे नाहीत आणि दुसऱ्याचा गैरसमज होणार नाही ह्याचीही काळजी घ्यायची. ह्यासाठी आपले बोलणे आणि ऐकणे सुधारणे खूप गरजेचे आहे.

माणूस एकतर नीट ऐकत नाही आणि ऐकले तरी नीट reproduce करत नाही. एकमेकांबद्दल केलेल्या gossiping मुळे गैरसमज वाढत जातात. एखाद्या माणसाबद्दल गैरसमज पसरविले तर त्याचे आयुष्य बरबाद होवू शकते. सामंजस्याने जीवनांत खूप चांगल्या गोष्टी घडतात. सॉक्रेटिस ह्या फिलॉसॉफरने आपण ऐकताना तीन फिल्टर लावले पाहिजेत असे सांगितलेले आहे.

पहिला फिल्टर लावायचा तो असा की, 'हे खरे आहे की खोटे आहे. तू स्वत: ऐकलेले आहेस किंवा पाहिलेले आहेस का?'

दुसरा फिल्टर लावायचा, 'तू जे सांगणार आहेस ते चांगले आहे की वाईट आहे.'

तिसरा फिल्टर लावायचा तो असा की, 'हे ऐकून मला काही फायदा होणार आहे. फायदा होणार नसेल तर सांगूच नकोस.'

कुठल्याही गोष्टीची प्रतिक्रिया देताना नीट ऐकून आणि बोलून जर प्रतिक्रिया दिली तर ती चांगलीच असणार आहे. दुसरे महत्वाचे असे की एखाद्याची वर्तणूक पहाताना बघण्याच्या पलिकडे बघता आले पाहिजे. 'तो असा का वागतो आहे?' हे आपल्याला समजून घेता आले पाहिजे. कुठल्याही घटनेचे लगेच जजमेंट देवून टाकणे योग्य नसते. दुसऱ्याबद्दल पूर्वग्रह ठेवून मत बनविले तर चुकीचे ठरू शकते.

सामंजस्यातून सहिष्णुता निर्माण होते, म्हणून ह्या दोघांचा एकमेकांशी संबध आहे. सभ्यतेचा संबंध नम्रतेशी आहे तसा सामंजस्याचा संबंध क्षमाशीलतेशी आहे. दुसऱ्याला समजून घेतले तरच क्षमा करता येते आणि जेवढी दुसऱ्याला क्षमा करता येईल तितके आपण मोकळे होत जाऊ. दया, क्षमा, शांती ही साखळी आहे. दया दाखविली तरच क्षमा करता येणार आणि क्षमा करता आली तरच शांती मिळणार. जीवनांत चुका कोण करत नाही? काम करणार त्याच्याकडून चुका होणार. ह्या चुका आपण पोटात घ्यायला शिकले पाहिजे. कार्यात, कुटुंबात सर्वच ठिकाणी सामंजस्य पाहिजे. आपण सर्वांनी सामंजस्याने वागूया आणि सुखी होवूया.

\- गुरुपौर्णिमा २०१७ तिसरा दिवस
(संकलित प्रवचन)

लोकमत हॅलो अकोला

गुरुवार, दि. ३० जून २०२२

## जीवनविद्या मिशन तत्त्वज्ञानातून बालसंस्कार



लोकमत न्यूज नेटवर्क

**अकोला :** सद्‌गुरू श्री वामनराव पै यांच्या जीवनविद्या मिशनच्या माध्यमातून अकोल्यात विविध उपक्रम राबविले जात असून, बाल संस्कार केंद्रातून संस्कारित पिढी घडविण्याचे काम केले जात आहे, असे प्रतिपादन जीवनविद्या मिशनचे संतोष सावंत यांनी केले.

२०२२-२३ हे वर्ष सद्‌गुरू श्री वामनराव पै यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. यानिमित्ताने जीवनविद्या मिशन, कांदिवली शाखेने अकोला हा तालुका दत्तक घेतला आहे. त्यानुसार महेंद्र खराडे, संतोष सावंत, गिरीश गावकर, नंदा पाटोळे, अजिता घाडी हे नामधारक अकोला येथे कार्याच्या नियोजनासाठी गेले होते. यावेळी त्यांनी उमरी परिसरातील बालसंस्कार केंद्राला भेट दिली.

या तत्त्वज्ञानामुळे मुलांमध्ये सकारात्मक बदल होत असल्याचे गौरवोद्‌गार सावंत यांनी काढले. अकोला येथे लवकरच जीवनविद्या मिशन केंद्र स्थापन करण्यात येईल, असेही सावंत यांनी स्पष्ट केले. यावेळी नंदा पाटोळे आणि अजिता घाडी यांनी शाळेतील शिक्षक, डॉक्टर यांची भेट घेऊन जीवनविद्या ज्ञानावर आधारित कोर्सेसविषयी माहिती दिली. या भेटीमध्ये माजी राज्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस चे प्रदेश उपाध्यक्ष गुलाबराव गावंडे साहेब यांची भेट घेऊन चर्चा करण्यात आली. यावेळी जेष्ठ नागरिक सेल, राष्ट्रवादीचे डॉ.अविनाश गावंडे रामदास खोबरखेडे आदी उपस्थित होते.

## कोर्सेसचा आनंद अनुभवूया...

**Updated Course Schedule**

**Jeevanvidya Dnyanpeeth, Karjat**

| SR. No | Day | Date | Course Type | Available seats | |
|---|---|---|---|---|---|
| 6 | Sat - Sun | 23-24 July | Level 2 | 0 | Full |
| 7 | Tue - Wed | 26-27 July | Level 2 | 150 | |
| 8 | Sat - Sun | 30-31 July | Level 2 | 0 | Full |
| 9 | Tue - Wed | 2-3 Aug | Level 2 | 150 | |
| 10 | Sat - Sun | 6-7 Aug | Level 3 | 100 | |
| 11 | Tue - Wed | 9-10 Aug | Level 2 | 150 | |
| 12 | Sat - Sun | 13-14 Aug | Level 2 | 0 | Full |
| 13 | Tue - Wed | 16-17 Aug | Level 2 | 150 | |
| 14 | Sat - Sun | 20-21 Aug | Level 2 | 150 | |
| 15 | Tue - Wed | 23-24 Aug | Level 3 | 150 | |
| 16 | Sat - Sun | 27-28 Aug | Level 2 | 100 | |
| 17 | Sat - Sun | 3-4 Sept | Level 3 | 150 | |
| 18 | Sat - Sun | 10-11 Sept | Level 2 | 150 | |
| 19 | Tue - Wed | 13-14 Sept | Level 2 | 150 | |
| 20 | Sat - Sun | 17-18 Sept | Level 2 | 150 | |
| 21 | Tue - Wed | 20-21 Sept | Level 2 | 150 | |
| 22 | Tue - Wed | 27-28 Sept | Level 2 | 150 | |

**Yuva and Foundation**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | Sunday | 17 July | Level 1 (Foundation) | Kamothe |
| 2 | Sunday | 24 July | Level 1 (Foundation) | Borivali |
| 3 | Sunday | 7 August | Yuva (15-21 age group) | Kamothe |
| 4 | Sunday | 21 August | Yuva (22-30 age group) | Kamothe |

पर्यावरण हाच नारायण -

## प्लॅस्टिकच्या राक्षसापासून सुटका

आला आषाढ बरसत, चिंब भिजली धरणी
फुटे अंकुर बिजांना, निसर्गाची ही करणी।।

युगानुयुगे निसर्ग आपले काम अविरतपणे, शांतपणे करीतच असतो. वसंतातील हव्याहव्याशा वाटणाऱ्या बदलाचे ग्रीष्मात चटके देणाऱ्या उन्हाळ्यात रुपांतर होते. याच ग्रीष्म ऋतूत बरसणारा पाऊस सृष्टीत नवचैतन्य निर्माण करतो. परंतु हवेत गारवा यायला अजून थोडा अवधी असतो. म्हणूनच आषाढ महिना हा खरे तर उन्हाळा म्हणूनच गणला जातो. भारतातील हिंदू पंचांगाप्रमाणे वर्षातील सहा ऋतू हे उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा यांच्यात विभागले जातात. आपल्याकडे साधारणपणे पुढे दिल्यानुसार ऋतूचक्राचे समीकरण असते. वाचकांच्या माहितीसाठी देत आहे.

उन्हाळयात दोन ऋतू, वसंत आणि ग्रीष्म म्हणजे (चैत्र, वैशाख + ज्येष्ठ, आषाढ हे मराठी महिने)

पावसाळयात दोन ऋतू, वर्षा आणि शरद (श्रावण, भाद्रपद + आश्विन, कार्तिक हे मराठी महिने)

हिवाळयात दोन ऋतू, हेमंत आणि शिशिर (मार्गशीर्ष, पौष + माघ, फाल्गुन हे मराठी महिने)

अलिकडे माणसाची बदललेली जीवनशैली व सहज सोप्या गोष्टींचा वाढता हव्यास निसर्गाचे हे समिकरणच बदलून टाकत आहे. शारिरीक स्वास्थ्यासाठी सुद्धा निसर्गातील हे बदल निसर्ग नियमानुसार गरजेचे असतात. पण माणूस उन्हाळ्यात एसी वापरून दोन्ही बाजूंनी स्वतःचेच नुकसान करून घेतो. एका बाजूने रोगप्रतिकारक शक्ती कमी होते तर दुसऱ्या बाजूने एसीमुळे पर्यावरणाची हानी होते. या सगळ्या गोष्टींचा अतिरेक झाल्याने हळू हळू त्यांचे दुष्परिणाम लक्षात येऊ लागले आहेत. त्यातीलच एक गोष्ट म्हणजे प्लॅस्टिकच्या वस्तूंचा अतीप्रमाणात वापर.

प्लॅस्टिक हे पर्यावरणासाठी किंबहुना संपूर्ण सजीव सृष्टीसाठी किती घातक आहे याचा विचार करुन आपल्या शासनाने आणि काही देशांनी विशिष्ट प्रकारच्या प्लॅस्टिकच्या वस्तुंवर बंदी घातली आहे. भारतात केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (CPCB) एकेरी वापराच्या प्लास्टिकवर बंदी घालण्यासाठी कठोर नियम केले आहेत. १ जुलै २०२२ पासून जर कोणी सिंगल-युज प्लास्टिक विकले किंवा या प्लास्टिकचा वापर करत असेल तर त्याच्यावर कठोर कारवाई केली जाईल.

कोणी म्हणेल recycle केले जाते ना मग काय हरकत आहे. सत्य परिस्थिती अशी आहे की



## घन कचरा निर्मूलन

2018 पासून महाराष्ट्र एकूण पाच कार्यशाळा कंपोस्ट खत गांडूळ खत तयार करण्यास उद्युक्त करणे ओला सुका कचरा विलगीकरण ओला कचरा वेगळा करून त्यातून सेंद्रिय खत निर्मिती करण्याचे मार्गदर्शन केले जाते ई-कचरा विलगीकरण प्लास्टिक विलगीकरण प्लास्टिकला पर्याय सुचविणे व पर्यावरण हानीसंबंधी जागरूकता निर्माण करणे पर्यावरण पूरक वस्तू वापरण्याबद्दल मार्गदर्शन व प्रदर्शने भरविणे 2021 सांगली महाराष्ट्र एकूण सहा कार्यशाळा

प्रचंड प्रमाणात प्लॅस्टिकचा कचरा निर्माण होतो त्यातील केवळ १० ते १२ टक्के कचऱ्याचा पुनर्वापर केला जातो (recycle and reuse) बाकीचा कचरा वर्षानुवर्षे जमिनीवर पडून रहातो किंवा समुद्रात जातो. दोन्ही ठिकाणी तो जीवसृष्टीसाठी घातक आहे. कारण या कचऱ्याचे विघटन होण्यासाठी साधारणपणे सातशे ते हजार वर्षे लागतील. त्याचा परिणाम म्हणून जमिनीचा कस कमी होईल, समुद्रात साठलेल्या प्लॅस्टिकच्या डोंगराने तिथली जीवसृष्टी धोक्यात येईल, विविध माध्यमातून प्राण्यांच्या आणि माणसांच्याही पोटात अन्नपाण्याद्वारे प्लॅस्टिक जाणे हे सुरू राहील. पुढे याचे काय परिणाम होतील कल्पनाही करवत नाही.

सेलिब्रेशनसाठी वापरात येणाऱ्या युज अॅण्ड थ्रो प्लॅस्टिकच्या वस्तू म्हणजे प्लेट्स, वाट्या, ग्लास, चमचे, सजावटीचे साहित्य या सगळ्या वस्तू, प्लास्टिक फ्लॅग, कार्डस्, पॅकींगचे सामान या सगळ्यांवर बंदी घालण्यात येणार आहे. या वस्तूंच्या अनिर्बंध वापरामुळे पर्यावरण धोक्यात आले आहे याबाबत कोणाचेही दुमत नाही. पाण्याचे नैसर्गिक स्त्रोतही त्यामुळे प्रदूषित होत आहेत. प्लास्टिकचे दुष्परिणाम पुढच्या पिढ्यांवर होतील. त्यामुळे आताच जागे होण्याची हीच योग्य वेळ आहे.'

माणसाने 'युज अँड थ्रो'- जीवनशैली स्वीकारली आणि तो निसर्गापासून दूर दूर जाऊ लागला. इतका दूर की निसर्गाचा अविभाज्य घटक असणारा माणूस स्वतःसोबत इतर जीवसृष्टीला विनाशाकडे घेऊन चालला आहे. पूर्वी पाणी पिण्यासाठी तांब्याभांडे ठेवले जायचे. घरी जास्त पाहुणे यायचे तेव्हा सुद्धा किंवा एखाद्या सार्वजनिक कार्यक्रमातसुद्धा हिच पद्धत होती. पण आता सरसकट प्लॅस्टिकच्या छोट्या बाटल्या वापरल्या जातात. अगदी वीस पंचवीस वर्षांपूर्वी जेवणासाठी विशिष्ट झाडाच्या पानांपासून बनवलेल्या पत्रावळी, द्रोण वापरले जात होते. अगदी पर्यावरण स्नेही पद्धत! किंवा ताट-वाट्या वगैरे तात्पुरते भाड्याने आणले जात. पण आता घरगुती समारंभ असो की मोठा समारंभ बऱ्याच ठिकाणी सरसकट थर्माकॉलची ताटं आणि पाणी पिण्यासाठी प्लॅस्टिकचे पेले वापरले जातात. त्या थर्माकॉलच्या आणि प्लॅस्टिकच्या वस्तूंचे पुढे काय होते कोणालाही माहीत नसते आणि जाणून घेण्याची गरज त्याहून वाटत नाही.

तीच गोष्ट प्लॅस्टिकच्या पिशव्यांची! आज ज्यांचे वय पंच्चेचाळीस-पन्नासच्या आसपास असेल त्यांना आठवत असेल की त्यांच्या लहाणपणी प्लॅस्टिकच्या पिशव्या आणि डबे यांच्याशिवाय कोणाचे काहीही अडत नव्हते. शाळेत न्यायचा जेवणाचा डबा पितळेचा किंवा स्टिलचा असायचा. शाळेच्या सार्वजनिक नळाचे पाणी सर्वजण बिनधास्त पीत असत, दप्तर आईने शिवलेल्या पिशवीचे किंवा कॅनव्हासच्या जाड कपड्याचेच असायचे. आता या सर्वांची जागा प्लॅस्टिकने घेतली आहे. जणू या वस्तू माणसाच्या जीवनातील अविभाज्य भाग होऊन बसल्या आहेत! यात बदल करण्याची नितांत गरज आहे. काळाची पावले ओळखून बदल करायलाच हवा!

गहू, तांदूळ, साखर, मसाले, कडधान्ये सर्व काही कागदी पिशव्यात देण्याचा आग्रह आपण दुकानदाराकडे करावा आणि आपण आपली कापडी पिशवी कायम सोबत ठेवायची. प्लास्टिक बंदी झाली तर काय करायचे? या

प्रश्नावर तोडगा सहज निघेल. पण अनिर्बंध वापर असाच सुरू राहिला तर भविष्यात काय होईल? किती भयंकर परिस्थिती निर्माण होईल? हा प्रश्न सर्वांना पडायला हवा तरच समाजात बदल घडेल.

समाजात दोन प्रकारचे बदल घडतात. एक म्हणजे हळूहळू सर्वांच्या कलाने घेत, जनजागृती करुन मानसिकता बदलणे ( Evolution) आणि दुसरा प्रकार म्हणजे Revolution म्हणजे अचानक पूर्णपणे केलेला बदल. प्रश्नाच्या मुळावरच घाव घालणे ! प्लॅस्टिकच्या राक्षसापासून सुटका मिळवण्यासाठी अशा Revolution चीच गरज आहे. Revolution

एकदा पालक आणि त्यांच्या मुलांसाठी सुरु असलेल्या एका शिबिरात एक प्रयोग करून बघण्यात आला. प्रथम पालकांच्या ग्रुपला कलर बॉक्स आणि पेपर दिले. त्यांना सांगितले की तुम्ही हे रंग वापरून चित्र काढा. आणि तुम्ही वापरून उरलेल्या रंगातूनच पुढचा ग्रुप चित्र काढेल. पालकांची चित्रे काढून झाल्यावर त्यांच्या मुलांना चित्र काढायला सांगितले. शेवटी दोघांनी आपापली चित्र एकमेकांना दाखवली तर आईवडिलांची चित्रं छान रंगीबेरंगी होती. पण मुलांसाठी रंगच शिल्लक न राहिल्याने मुलांची चित्रं मात्र काळी पांढरी, राखाडी, करडी!

आईवडिलांनी एवढे रंग वापरले की मुलांसाठी चांगले रंग उरलेच नाहीत! या प्रयोगातून आपल्याला काय शिकायचे आहे याचा विचार करण्याइतपत आपण नक्कीच सूज्ञ आहोत! ही वेळ आपल्या मुलांवर येऊ द्यायची नसेल तर बदल करुया. सवयी बदलूया! सृष्टीतील रंग तसेच अबाधित राखणे आपल्या प्रत्येकाच्या हातात आहे.




जीवनविद्या सांगते 'सावध तो सुखी'. आता थोडासा त्रास, अव्यवस्था होईल असे वाटले तरी आपल्या पुढच्या पिढ्यांना सुंदर जीवन देण्याची आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी 'पर्यावरण हाच नारायण' हे लक्षात ठेवून या क्रांतीमध्ये (revolution) आपण सर्वांनी सहभाग घेऊन ती यशस्वी करून दाखवूया!

**अनिता सुनील मोरे,** सी.बी. डी. बेलापूर
९९६७९६६१५०



रविवार दि. 26 जून 2022 रोजी

महिंद्रा सीआयई ऑटोमोटिव्ह कंपनी लिमिटेड चाकण व जीवनविद्या फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामसमृद्धी अभियान अंतर्गत संयुक्त ग्रामपंचायत मांजरेवाडी धर्म, पिंपळ, मलघेवाडी मधील शेतकऱ्यांसाठी 50 % अनुदानातून शेती उपयोगी वस्तुंचे वाटप करण्यात आले. यामध्ये सायकल कोळपे, स्प्रे पंप तसेच सोयाबीन बियाणे यांचे शेतकऱ्यांच्या मागणीनुसार वाटप करण्यात आले. महिंद्रा कंपनी अधिकारी, मांजरेवाडी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि जीवनविद्या मिशनचे अनुभवी विश्वस्त श्री.आनंद राणे, श्री.नवनाथ हळदणकर तसेच पिंपरी शाखेतील कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

जीवनविद्या मिशन, शाखा : पिंपरी - भोसरी

जीवनविद्या मिशन
तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार



थोर समाजसुधारक, तत्त्वज्ञ
सद्गुरू श्री वामनराव पै



श्री. प्रल्हाद वामनराव पै
B. Tech IIT Mumbai (Powai), MAM, TQM (Japan)



मातृतुल्य सौ. शारदामाई

100
सद्गुरू श्री वामनराव पै
जन्मशताब्दी

# ।। सन्मानपत्र ।।

**आदरणीय डॉ. सौ. माधवी दिलीप पटवर्धन, MD (Medicine)**

सद्गुरू श्री वामनराव पै यांनी शरीर साक्षात परमेश्वर हा महान ग्रंथ शरीररूपी ईश्वरी व्यवस्थेला पूरक व पोषक उपचारांद्वारे परमेश्वराची उपासना करणाऱ्या सर्व डॉक्टरांच्या चरणी समर्पित केला आहे.

डॉ. माधवी पटवर्धन आपण मिरज मेडीकल कॉलेजमधील अधिव्याख्याता या पदापासून आपली व्यावसायिक कारकीर्द सुरू केलीत. व्यावसायिकता, प्रयोगशीलता आणि सामाजिक जबाबदारी यांचे सुयोग्य संतुलन आपण आपल्या जीवनात साधले. आपल्या समाजात डोळ्यांच्या आरोग्याविषयीच्या समस्या अजूनही खूप आहेत हे जाणूनच आपण "मधुमेह जागृती मंच" ही संस्था सुरू केली. मधुमेहामुळे येणारे अंधत्व टाळण्यासाठी व्याख्याने देऊन जनजागृती करीत राहिलात. आपण आपल्या पतीसह नंदादीप या आपल्या हॉस्पिटलमध्ये लाखो रूग्णांच्या डोळ्यांवर लेझर उपचार करून त्यांना अंधारातून प्रकाशाकडे नेत नवजीवन दिले. वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर संस्थाच्या महत्वपूर्ण पदांवर कार्यरत राहून आपण आपली कामगिरी उत्तमरीतीने बजावीत आहात.

जीवनविद्या मिशनचे अनुभवी विश्वस्त आणि अध्यक्ष डॉ. दिलीप पटवर्धन यांच्या आपण सुविद्य पत्नी आहात. आपणां उभयतांचे आनंदी आणि क्रियाशील सहजीवन आम्हां सर्वांसाठीच आदर्श आणि प्रेरणादायी आहे. आपण जीवनविद्या मिशनच्या कार्यात सदैव अग्रेसर आहात. बालसंस्कार केंद्र घेत असताना सुजाण पालकत्वाची जाणीव आपण समस्त पालकवर्गास करून देता. आपण चालविलेल्या प्लॅस्टिकमुक्ती अभियानाची नोंद सरकार दरबारी झाली. सांगली मिरज आणि कुपवाड महापालिकेच्या स्वच्छ सर्वेक्षण २०२२ साठी ब्रँड अँबेसिडर म्हणून आपणां उभयतांची झालेली निवड हा आपल्या कारकीर्दीच्या मुकुटातील मानाचा तुराच आहे.

आपल्या संपूर्ण कुटुंबाच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रगतीचा आलेख पाहता "शुध्द बीजापोटी फळे रसाळ गोमटी" या संतउक्तीचा प्रत्यय येतो. आपण आपल्या मुलांना निर्भयपणे, आत्मविश्वासाने जीवनात वाटचाल करण्याचे संस्कार दिलेत. आपण केलेल्या कार्याविषयी जीवनविद्या मिशन आपली सदैव कृतज्ञ आहे. हे सन्मानपत्र आपणास प्रदान करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. आपल्या निरामय, निरोगी सुखी जीवनासाठी जीवनविद्या परिवारातर्फे आपणांस लाख लाख शुभेच्छा !

श्री. प्रल्हाद वामनराव पै
आजीव विश्वस्त, जीवनविद्या मिशन

काय दिलेस मज तू ....

जीवनविद्या मिशनमध्ये आल्यानंतर मला काय मिळाले हे शब्दात सांगणे खूप कठीण आहे. तरीदेखील मी थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा मी कांदिवली येथे राहत होतो. त्याठिकाणी राहणाऱ्या श्रीमती राणेताई यांनी मला "तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार" आणि "विश्वप्रार्थना" असे दोन स्टिकर मला २००१-०२ साली दिले. आणि त्या मला वेळोवेळी सद्गुरू श्री वामनराव पै यांच्याविषयी माहिती सांगायच्या. त्यामुळे मी दर रविवारी सह्याद्री चॅनलवर सद्गुरूंचे प्रवचन ऐकू लागलो. त्यानंतर मुंबईमध्ये कोठेही सद्गुरूंच्या प्रवचनाचा कार्यक्रम आहे हे मला समजले की मी तिथे एकटाच जाऊन बसायचो. खरंतर मला विश्वप्रार्थना वाचल्यानंतर त्यातील गोडी कळली आणि अर्थानुसार आवड निर्माण झाली. मुळात दगडाला शेंदूर फासून देव-देव करणं हा माझा स्वभाव नाही. इतरांपेक्षा हे काही वेगळं आहे यावर माझा विश्वास बसला. त्यामुळे मी ज्या ठिकाणी सद्गुरूंचे कार्यक्रम असायचे तेथून मी प्रवचनाची सीडी, कॅसेट वगैरे घेऊन यायचो. माझ्या मोबाईलमध्ये विश्वप्रार्थना वाजवता यावी असं मला खूप वाटू लागलं. त्यामुळे मी माझ्या घरी सीडी किंवा कॅसेट लावून किंवा सह्याद्री चैनलवरील प्रवचन संपल्यानंतर लागणाऱ्या विश्वप्रार्थनेचे रेकॉर्डिंग दरवाजा खिडकी बंद करून मोबाईलमध्ये करण्याचा प्रयत्न करू लागलो. परंतु कित्येक वेळा प्रयत्न करूनही नीट रेकॉर्डिंग होत नव्हते. मी कामावर किंवा इतर कुठेही जेथे जात होतो त्या ठिकाणी विश्वप्रार्थनेविषयी आणि 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' या सिद्धांताविषयी सांगत होतो. तसेच सद्गुरूंविषयीची माहिती देत प्रचार व प्रसार करत होतो. मला सद्गुरू विषयी अतिशय प्रेमभावना वाटू लागली होती. कारण ते स्वतः उच्चशिक्षित असल्यामुळे त्यांनी सांगितलेल्या गोष्टींवर मला जास्त विश्वास वाटू लागला. मला स्वतःला जीवनविद्या आवडली होती आणि माझा जीवनविद्या मिशन मध्ये प्रवेश झाला होता.

एके दिवशी माझा मोबाईल चोरीला गेला आणि नवीन मोबाईल खरेदी करणे मला शक्य नव्हते. यामुळे मी माझ्या एका मित्राला मला सेकंडहॅन्ड मोबाइल मिळवून देण्यासाठी सांगितले. त्याने मला एक मोबाईल दुसऱ्याकडून घेऊन दिला. ( तो मोबाईल चोरीचा होता हे मला नंतर समजले) मी तो वापरू लागलो. तीन चार दिवसानंतर त्यातील स्टोअरेज वगैरे पाहत असताना त्यात मला विश्वप्रार्थना ऑडिओ मिळाला. अजूनही काही देवाचे फोटो आणि गाणी होती. परंतु माझ्यासाठी महत्त्वाचे म्हणजे मला तिथे विश्वप्रार्थना मिळाली. मी अतिशय आनंदी झालो. जे मी प्रयत्न करून होत नव्हते ते मला सहज उपलब्ध झाले होते.

मी सद्गुरूंच्या प्रवचनाला, इतर कार्यक्रमांना जात होतो. परंतु सद्गुरूंना भेटण्याची मनात खूप इच्छा असूनही मी भीतीपोटी कधी जाऊन भेटण्याचा प्रयत्न केला नाही. पण मनामध्ये भेटण्याची इच्छा तर होती. एक दिवस मी ऑफिस मधून घरी जात होतो. बोरीवली नॅशनल पार्कच्या गेटसमोर रस्ता क्रॉस केला आणि माझ्या उजव्या बाजूने एक गाडी निघून गेली. त्यावर विश्वप्रार्थना लिहिलेली होती, मनात आलं की सद्गुरूंची गाडी गेली. गाडी सरळ बोरीवली स्टेशन रोडने पुढे गेली आणि मी डाव्या

बाजूच्या भाजीमार्केट रोडने स्टेशनकडे चालत होतो. इतक्यात तीच गाडी पुढच्या रोडने वळून माझ्या अगदी जवळ येऊन उभी राहिली. इतक्यात गाडीचा दरवाजा उघडला आणि मी बघतो तर काय, साक्षात सद्गुरू माऊली माझ्यासमोर गाडीमध्ये आहेत. मी भारावून गेलो, सद्गुरूंचे चरण स्पर्श करून नमस्कार केला. गाडीचे ड्रायव्हर कोण होते? गाडीत आणखी कोण आहेत? हे मी काही पाहिले नाही. गाडीतून कोणी उतरले नाही किंवा कोणी काही खरेदी केली, नाही मग गाडी का थांबली? काहीच कळलं नाही. माझे मन सुन्न झाले होते. अशाप्रकारे माझी सद्गुरूंना भेटण्याची इच्छा पूर्ण झाली. यापेक्षा मोठे भाग्य नाही. या दोन्ही प्रसंगातून हेच लक्षात येते की जीवनविद्या सांगते त्याप्रमाणे, तुम्ही ज्या गोष्टीची मनापासून इच्छा करता आणि तसे विचार करता निसर्ग नियमानुसार तो विचार आपल्या अंतर्मनात जाऊन कालांतराने आपल्या जीवनात साकार होते. याचा मी अनुभव घेतला.

त्यानंतर मी मीरा रोडला मोठं घर घेतलं, मनापासून सद्गुरू कार्य करण्याची इच्छा होती. पण ओळख कोणाचीही नव्हती आणि त्यावेळी मी शोध घेत होतो. पालव-लाड हे नामधारक कुटुंब आमच्या समोरच्या इमारतींमध्ये राहण्यासाठी आले. मी पुन्हा एकदा जीवनविद्या मिशनशी जोडला गेलो. तसे माझ्याकडून जीवनविद्येचे कोणतेही मोठे कार्य झाले नाही. परंतु मनापासून मी जिथे जिथे जात होतो तेथे प्रार्थनेचे महत्त्व, जीवनविद्या, सद्गुरू विषयी सांगत असे. आणि 'तूच आहेस तुझ्या जिवनाचा शिल्पकार' या जीवनविद्येच्या शिकवणीबाबत जे काही मला वाटतं ते मी कथन करीत होतो. सह्याद्री चॅनलवर होणाऱ्या प्रवचनाबाबत माहिती देत होतो.

२०१७ मध्ये माझ्या मिसेसला कॅन्सरचा आजार डिटेक्ट झाला. मी घाबरलो नाही. परंतु मनावर खूप ताण आला होता, पण मला विश्वास होता यातून ती बाहेर पडणार. मिसेसचे ऑपरेशन झाले, पूर्ण उपचार करून त्यानंतर नियमित औषधोपचार चालू झाला. परंतु कुटुंबावर मोठे संकट आल्यासारखे झाले होते, सद्गुरूंची आठवण करून विश्वप्रार्थना म्हणत म्हणत सर्व गोष्टींना सामोरा गेलो. आर्थिक आणि मानसिक ताणतणाव वाढला होता. मुलांच्या शिक्षणावर परिणाम झाला.

इतक्यात मला हार्ट अटॅक आला. अचानक हॉस्पिटलमध्ये भरती झालो. घरी कुणालाही माहीत नव्हते कारण आधीच कुटुंब मोठ्या संकटात होते. मुलं डिस्टर्ब होती.

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर
स्वच्छता अभियान
स्वच्छतेची जोपासना हीच ईश्वराची उपासना
। ओला-सुका ई-कचरा वर्गीकरण व विल्हेवाट प्रशिक्षण । घरगुती व उद्योग क्षेत्रातील शुन्य कचरा उद्दिष्ट्य । सेंद्रीय खत निर्मितीचे प्रशिक्षण व जनजागृती
संपर्क : सुदर्शन कामुनी : ९८६९०४७९९१


डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार माझी त्वरित बायपास सर्जरी करणं अत्यावश्यक होतं. हॉस्पिटलमध्ये माझ्यासोबत घरचे कोणीही नव्हतं. माझ्या शेजारी राहणारे माझे एक मित्र सोबत होते. त्यांनी मला ॲडमिट करून ते आम्ही राहतो त्या कॉलनीमध्ये आले, सायंकाळी सहा-साडेसहा नंतर त्यांनी कॉलनीमधील सर्व रहिवाशांना याबाबत माहिती दिली. एका रात्रीमध्ये सकाळी दहा वाजेपर्यंत साडेसहा लाख रुपये जमा करून ते सर्वजण हॉस्पिटलमध्ये आले. माझ्या बायपास सर्जरीकरिता पैसे भरून सर्व उपचारासाठी मदत केली. आता आम्ही सगळे छान आनंदात आहोत, माझ्याकडून मनापासून जे कार्य झाले त्यामुळे ही सगळी व्यवस्था झाली! आता आणखी सद्‌गुरूंनी मला काय दिलं ते काय सांगू?

अलीकडेच सहा महिन्यापूर्वी मीरा रोड शाखेचे नामधारक श्री. सुशील चव्हाण व सौ. चव्हाण यांची ओळख झाली. त्यांनी जीवनविद्येच्या कार्यात मला सहभागी करून घेतलं. मी त्यांना कार्यात सहकार्य करू लागलो. प्रबोधक सौ. सुरेखाताई नर यांच्याकडून मी सद्‌गुरूंच्यावतीने अनुग्रह घेतला. जीवनविद्येच्या कार्यात सहभागी झाल्यामुळे जे अस्थिर मन भटकत होतं ते हळूहळू शांत झाले. शुभचिंतन आणि विश्वप्रार्थनेत रंगू लागले. माझी मुलगी जॉबला लागली, मुलगा एम.एस.सी. सेकंड इयरला आहे. कुटुंब आता छानपैकी चाललं आहे आणि हे सारे मला जीवनविद्येमुळेच मिळाले. मी सर्वांची मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो. माझ्या हातून माझ्या कुटुंबाकडून यापुढेही यापेक्षाही मोठ्या प्रमाणात सद्‌गुरू कार्य, सद्‌गुरू सेवा होत राहो हीच माझी सद्‌गुरू चरणी प्रार्थना आहे.

शरद सावंत - मीरारोड

# बालकक्षा

## बालसंस्कार केंद्रातील अभ्यासक्रमावर आधारित प्रश्न मंजुषा

**१. वाचनाचे फायदे पुढीलपैकी कोणते आहेत?**

अ) मनोरंजन होते
आ) ज्ञान मिळते
इ) क्षमता वाढते
ई) वरील पैकी सर्व

**२. अभ्यास कसा करावा?**

अ) रात्री जागरण करून
आ) परिक्षा जवळ आल्यावर घाईघाईत
इ) युक्तीने नियोजनपूर्वक
ई) मनाला वाटेल तसा

**३. निसर्ग आपल्याला काय शिकवतो?**

अ) नियम पाळण्याची गरज नाही
आ) आनंद वाटा आनंद लुटा
इ) फक्त घेण्याचे काम करा
ई) आपले काम दुसरे कोणी तरी करेल

**४. बहिर्मनाचा अंतर्मनावर प्रभाव कशामुळे पडतो?**

अ) पुन्हा पुन्हा केलेले विचार
आ) संगती
इ) जाणीवपूर्वक केलेले काम
ई) वरील पैकी सर्व

संस्कारांची संगत

मनमंदीराला आनंदाच्या आणि ज्ञानाच्या तेजाने उजळून टाकण्यासाठी काय करायला हवे याचे मार्गदर्शन जीवनविद्या करते. 'अर्थ प्राप्त करून देणारे, स्वार्थ साधणारे, अनर्थ निर्माण करणारे व परमार्थ सिद्ध करणारे मन हे आपल्या जीवनाचे केंद्र आहे.' कारण 'जसे मन तसे तन, जन आणि जीवन' असे जीवनविद्येचे अमृत तुषार आहेत. या लेखमालेत आपण माणसाचे मन घडविण्यामध्ये संगती किती महत्त्वाची भूमिका बजावते हे पहात असताना विविध प्रकारच्या संगतीविषयी चिंतन केले. लहान मुलांना मिळणारी पालकांची संगत, पुस्तकांची संगत, विचारांची संगत, मित्रांची संगत तसेच डिजिटल संगत हे विषय आपण पाहिले. आता आपण बोलणार आहोत संस्कारांच्या संगतीविषयी.

लहान वयात व्यक्तीवर कळत-नकळत जे संस्कार होतात ते खोल अंतर्मनात रुजतात आणि संपूर्ण आयुष्यभर त्याला साथ देतात. या संस्कारांमध्ये विशिष्ट समाजाच्या चालीरीती, समजूती, श्रद्धास्थानं किंवा अंधश्रद्धा यांचा समावेश सुद्धा होतो. कारण जे दृष्य मुलं पुन्हा पुन्हा पहातात, ज्या गोष्टी पुन्हा पुन्हा कानावर पडतात त्या सर्वांचा प्रभाव अंतर्मनावर पडतो. त्यानुसार अंतर्मनाचा पॅटर्न तयार होतो. बहिर्मन अंतर्मनाच्या पॅटर्नप्रमाणे क्रिया करते आणि त्याबरहुकूम आपले जीवन साकार होते. एकंदरीत संस्कार म्हणजे विचारसरणी आणि त्यातून निर्माण होतो दृष्टिकोन! जगाकडे बघण्याचा आणि स्वतःकडे बघण्याचाही!

आईच्या गर्भामध्ये असतानाच बाळावर संस्कार होत असतात. त्या काळात त्या अर्भकावर कोणते संस्कार होतील हे मातापित्याचे विचार, त्यांचे संस्कार, परिस्थिती यावर अवलंबून असते. जे सूज्ञ असतात ते बाळावर गर्भात असल्यापासूनच चांगले संस्कार कसे होतील याची व्यवस्थित काळजी घेतात. ज्यांनी जीवनविद्या मिशन आयोजित गर्भसंस्कार कोर्स केला आहे त्यांनी हा अनुभव घेतला आहे. योग्य नियोजनबद्ध रितीने गर्भातील बाळावर सुसंस्कार केल्याने त्यांना त्यांच्या बाळात विलक्षण वेगळेपण दिसून आले. तशा प्रकारच्या प्रतिक्रिया त्यांनी दिलेल्या आहेत.

त्यानंतर मूल जन्माला आल्यानंतर ते ज्या लोकांच्या सहवासात आहे त्याप्रमाणे त्याच्यावर संस्कार होतात. मुलं मोठ्या माणसांचे अनुकरण करतात. बोलणेचालणे, खाणेपिणे आणि दैनंदिन जीवनातील इतर सर्व गोष्टी मुलं इतरांचे पाहूनच शिकत असतात. इतकेच नव्हे तर एखाद्या विशिष्ट गोष्टीला प्रतिक्रिया देण्याची पद्धतसुद्धा मोठ्या माणसांच्या निरिक्षणातून शिकतात. उदाहरणार्थ


विद्यार्थी मार्गदर्शन अभियान
या संवादामधुन आपणास काय मिळेल.
▶ अभ्यासाच्या पद्धती व अभ्यासाचे महत्त्व ▶ राष्ट्रभक्ती व राष्ट्रप्रेम
▶ शरीराचे महत्त्व ▶ चांगली संगती व व्यसनापासून अलिप्ती
▶ निसर्गनियमांचे जीवनातील महत्त्व
आपल्या शाळेचा फक्त एक तास आम्हाला द्या. संपर्क : श्री. दिलीप निर्मल ९८७०३१०१३७

लहान बाळ चालताना पडलं किंवा खुर्चीला आपटलं आणि रडायला लागलं तर घरातील मंडळी म्हणतात, "थांब हं! या जमिनीला एक फटका देतो किंवा या खुर्चीला एक सपाटा देतो, आमच्या सोन्याला लागली काय!" इथे सोन्या काय शिकला? मला जर काही त्रास झाला तर त्याला मी स्वतः नाही तर इतर कोणीतरी जबाबदार आहे. तेच जर त्याला सांगितले की, "तू धडपडलास म्हणून तुला लागले, सांभाळून चाल." तर त्याच्यावर संस्कार झाले की माझ्या बाबतीत जे होते त्याला सर्वस्वी मी जबाबदार आहे. आणि तो इतरांना दोष देणार नाही. ही गोष्ट खूप छोटी वाटली तरी अशा लहान लहान घटनांना मोठ्या माणसांनी दिलेल्या प्रतिक्रिया मुलांना घडवत किंवा बिघडवत असतात.

घरातील माणसे एकमेकांशी प्रेमाने वागतात की सतत भांडतात, समाजात वावरताना मनात करुणा बाळगून माणुसकीने वागतात की स्वार्थीपणे वागतात या सर्व गोष्टी मुलं बघतात आणि त्याप्रमाणे त्यांच्यावर संस्कार होत असतात. म्हणून जाणीवपूर्वक चांगले संस्कार करावे लागतात. बालसंस्कार केंद्रात येणाऱ्या मुलांचे पालक सांगतात, 'जीवनविद्येच्या बालसंस्कार केंद्रात मुलांसोबत आम्हाला सुद्धा खूप शिकायला मिळते.' किंवा 'मुलांना लागलेल्या चुकिच्या सवयी गेल्या आणि त्यांच्या वागण्यात सुंदर परिवर्तन झाले आहे' असे अनेक पालक सांगतात.

यावरुन एक गोष्ट प्रकर्षाने सांगाविशी वाटते मुलांना चांगल्या सवयी लागण्यासाठी, त्यांना चांगले संस्कार देण्यासाठी पालकांनी आत्मपरीक्षण करायला हवे. कारण लहानपणी लागलेल्या सवयी आणि झालेले संस्कार मुलांच्या जीवनाला आकार देत असतात. लहान मुलांचे अंतर्मन अतिशय सक्रिय असते, म्हणूनच ते नवीन गोष्टी, नवीन भाषा, वेगवेगळ्या प्रकारची कौशल्ये लगेच आत्मसात करू शकतात. मोठ्या माणसांच्या तुलनेने लहान मुलं नवीन गोष्टी पटकन शिकतात. हिच योग्य वेळ असते चांगल्या सवयी आणि चांगले संस्कार त्याच्या मनावर बिंबविण्याची!

लहान मूल म्हणजे मातीचा गोळा नाही तर प्रचंड उर्जेचा स्त्रोत असतो. ही उर्जा कोणत्या दिशेला वळणार, अधोगतीकडे की उर्ध्वगती घेणार हे प्रामुख्याने लहानपणी मिळणाऱ्या संस्कारांवर अवलंबून असते. म्हणूनच मुलांवर जाणीवपूर्वक चांगले संस्कार करावे लागतात. प्रत्येकाकडे दिव्यत्व आहेच. चांगल्या संस्कारांनी या दिव्यत्वाला आवाहन करुन मुलांचे मनमंदीर तेजाने उजळून टाकणे हे प्रत्येक पालकाचे किंबहुना समाजातील प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

समाजाप्रती असलेले आपले हे कर्तव्य सजगपणे पार पाडणाऱ्या जीवनविद्येच्या बालसंस्कार केंद्र चालक चालिका आणि या उपक्रमासाठी योगदान देणाऱ्या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद! बालकांचे जीवन घडविण्याचे अखंड व्रत घेतलेल्या या सर्व नामधारक बंधुभगिनींना गुरू पौर्णिमेच्या अनंत शुभेच्छा!

**अनिता सुनील मोरे**, सी. बी. डी. बेलापूर
९९६७९६६१५०

**१. वाचनाचे फायदे पुढीलपैकी कोणते आहेत?**
**उत्तर - ई) वरील पैकी सर्व**

**२. अभ्यास कसा करावा?**
**उत्तर - इ) युक्तीने नियोजनपूर्वक**

प्रश्न तुमचे उत्तर प्रल्हाददादांचे

**प्रश्न :- आनंदासाठी चैतन्यशक्ती जन्म घेते म्हणजेच उपाधी धारण करते. चैतन्यशक्ती शिवाय उपाधी काहीच करू शकत नाही याचा अर्थ जीवन जगत असताना इतरांना सुख किंवा दु:ख देणारी चैतन्यशक्तीच असते का ?**

उत्तर :- चैतन्यशक्ती ही मुळात सच्चिदानंद स्वरूप आहे, आनंदस्वरूप आहे. ती स्वत:ला विसरलेली आहे. या चैतन्यशक्तीवर आपण संस्कार केलेले आहेत त्यामुळे आता जे काही करत आहे ते चैतन्यशक्ती करत नसून आपण करत आहोत. चैतन्यशक्ती ही फक्त अधिष्ठान आहे. सगळे काही करणारे आपण आहोत. दुसऱ्याला सुख द्यायचे कि दु:ख हे आपण ठरवतो, चैतन्यशक्ती ठरवित नाही. चैतन्यशक्ती ही ज्या देहातून वावरते त्या देहाच्या नावाने स्वत:ला ओळखू लागलेली आहे. त्या देहावर झालेल्या संस्कारांप्रमाणे त्या देहाच्या रोलमध्ये ती वावरते. चैतन्यशक्ती ही जरी स्वत: आनंदस्वरूप असली तरी ती जेव्हा उपाधी धारण करते तेव्हा ती व्यक्ती म्हणून नांदते. व्यक्ती म्हटली की तिच्याकडे सुख दु:ख, अहंकार, द्वेष, मत्सर, श्रेष्ठकनिष्ठ भाव, राग, लोभ या सगळ्या गोष्टी आल्याच. व्यक्तीच्या देहाच्या माध्यमातून हे सर्व व्यक्त होत असते. हे होत असताना ती त्या व्यक्तीवरील संस्काराप्रमाणे व्यक्त होते. इथे चैतन्यशक्ती ही फक्त अधिष्ठान आहे हे लक्षात ठेवायचे. सद्गुरूंनी हा विषय स्पष्ट करताना वीजेचे उदाहरण दिलेले आहे. वीज ही अधिष्ठान आहे. तिने व्यक्त कसे व्हायचे, प्रकट कसे व्हायचे हे आपल्या हातात आहे. तसे व्यक्तीच्या ठिकाणी चैतन्यशक्ती ही अधिष्ठान आहे. व्यक्तीकडे राग, मत्सर, अहंकार इत्यादी गोष्टी असल्यामुळे व्यक्ती जे काही करते ते या भावनांच्या माध्यमातून करते. जीवन जगत असताना व्यक्ती मीपणाच्या अधिष्ठानावर सर्व कर्मे करीत असते. चैतन्यशक्ती आहे म्हणून सर्व चाललेले आहे हे जरी खरे असले तरी जे काही करते ते व्यक्ती करत असते. वीज हे अधिष्ठान आहे पण तिचा वापर कसा करायचा हे व्यक्ती ठरवित असते, वीज काहीही ठरवत नाही. शॉर्टसर्किट करून आग लावायची की दिवे लावून प्रकाश आणायचा हे व्यक्ती ठरवित असते. तसे इतरांना सुख द्यायचे की दु:ख द्यायचे हे व्यक्ती ठरवित असते, चैतन्यशक्ती ठरवित नाही.

India marathi conf. call
dt. 24/2/2021






# स्त्री सन्मान अभियान

स्त्रीचा आत्मसन्मान जागृत करून सर्वांनी स्त्रीचा सन्मान करावा यासाठी जनजागृती करत आहोत.
या उपक्रमांतर्गत महिलांना मुख्य प्रवाहात आणले जात आहे.
१) बेटी बचाव, २) बेटी पढाव, ३) विधवांना वेगळी वागणूक न देणे
२०१६ पासून. महाराष्ट्र. दोन कार्यशाळा.

**जीवन परिपूर्ण...**

क्षण हा असा प्रत्येकाच्या जीवनात येतो, जेव्हा शिष्य खरा साधक होतो आणि सद् गुरुचरणी मनसुमन अर्पण करतो. सद् गुरुंनासुद्धा आपल्या मनाखेरीज काहीही नको असते. ज्याच्या मनाला त्यांच्या ज्ञानाने शुद्ध केले, त्यात असणारे दिव्यत्व दाखविले त्या शिष्याने सद्गुरुंनाच हृदयात विराजमान करावे असा तो क्षण. वास्तविक शिष्याची आणि सद्गुरुंची दोघांचीही इच्छा हीच असते. जेव्हा शिष्याच्या मनाच्या कणाकणात फक्त आणि फक्त सद् गुरुच वास करतात तेव्हाच ते मन सुमन होते. त्यातून पुढे दरवळणाऱ्या प्रेम भक्तीच्या सुगंधाने प्रसन्न होऊन सद्गुरु नित्य त्या मनात वास करू लागतात. मग तो शिष्य दिसायला शिष्य असतो पण असायला सद्गुरुच होतो, कारण त्याने आपलं मन सद्गुरुंना वाहिलेले असते. यामुळे त्याचा संसार सुखाचा होतोच पण परमार्थही सिद्ध होतो. अशा तर्हेने खऱ्या अन परिपूर्ण जीवनाला सुरुवात होते. अर्थात जीवनाचे गणित सुटते किंवा जीवन परिपूर्ण होते. तो दिवस म्हणजे त्या साधकाची जणू दिवाळीच.

या जन्मी श्री सद्गुरुंच्या आगमनाने माझ्यासारख्या असंख्य पामरांना मार्ग मिळाला. याला कारण आईवडिलांची किंवा संचितातील महापुण्याईच. हा मार्ग म्हणजे जीवनविद्येचा खऱ्याखुऱ्या सुखी जीवनाचा मार्ग. आज १९९३-९४ च्या सत्यनारायणकडे वळून पाहता माझे मलाच आश्चर्य वाटते व अचंबित व्हायला होते की फक्त एका सद्गुरुंमुळे जीवन इतके कसे बदलू शकते! अहो यालाच तर तुकाराम महाराज म्हणतात ना “आपणा सारीखे करिती तात्काळ, नाही काळवेळ तया लागे” आणि सद्गुरूंनी यालाच नकळत क्रांती म्हंटली आहे. भाषा, ज्ञान, शिक्षण, पद, प्रतिष्ठा हे सर्व खरं तर खरे नसतात. सद्गुरु भेटल्यावर एक नवीन भाषा शिकता येते ती म्हणजे माणुसकीची भाषा, ज्ञान मिळते प्रथम जीवन जगण्याचे, शिक्षण मिळते शहाणपणाचे, पद मिळते शिष्यत्वाचे आणि प्रतिष्ठा मिळते नामधारक या उपाधीला. हे सर्व विनासायास मिळत नाही, त्यासाठी प्रयत्न करावे लागतात. हे सर्व साध्य होते खरे सद्गुरु भेटल्यावर आणि त्यांची कृपा झाल्यावर. म्हणून सायास करावे सद् गुरु भेटण्यासाठी आणि बुद्धी व्हावी त्यांना शरण जाण्याची. शिष्याने खरे तर एवढेच करायचं असते. उरलेले सर्व सद्गुरु करतात. श्री. प्रल्हाददादा जसे सांगतात “मनाची लुडबुड नको”. मन सद्गुरुंना सोपवा मग सद्गुरू सगळे सोपं करतील. हाच अनुभव माझ्यासह अनेकांचा आहे. मनात सद्गुरु असतील तरच मनाला आनंद मिळतो. कारण मनात सद्गुरु असणे म्हणजे सद्गुरुंचे ज्ञान, त्यांची शिकवण असणे, 'शरीर साक्षात परमेश्वर' कळला की भाषा माणुसकीची होते. पद (सद्गुरुंचे चरण दिव्यबोध, दिव्यसाधना ) हे समजून घेतले की अढळ पदाच्या दिशेने वाटचाल सुरु होते. प्रतिष्ठा मानसम्मान रूपाने भरभरून मिळते, हे सर्व कुणाला मिळते? अहो ! तुमच्यातल्या सद् गुरुंनाच मिळत नाही का ?

अर्थात गुरुपौर्णिमा हा सण प्रथम ज्ञान घेण्याचा सद्गुरुंकडून, मग ते ज्ञान आत्मसात करायचे सद्गुरु सानिध्यात राहून. ते ज्ञान जीवनात उतरवायचे जीवन जगताना आणि मग लोकांना गुणगान करून पटवून द्यायचे की मग आपल्यासह सर्वांच्या जीवनाला अर्थ प्राप्त होतो.

**पुढे सुरू होतो तो सुखाचा प्रवास,**
**त्यांचा ध्यास, त्यांचाच सहवास....**
**सद्गुरु राया मज दे.. सर्वांना दे..**
**सर्वांचं जीवन परिपूर्ण होऊ दे....**

**वाय. सत्यनारायण**, साकीनाका
९८२०९२१७७४

जीवनविद्या मिशन
तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार



थोर समाजसुधारक, तत्त्वज्ञ
सद्गुरू श्री वामनराव पै



श्री. प्रल्हाद वामनराव पै
B. Tech IIT Mumbai (Powai), MAM, TQM (Japan)



मातृतुल्य सौ. शारदामाई

100
सद्गुरू श्री वामनराव पै
जन्मशताब्दी

# ।। सन्मानपत्र ।।

सन्माननीय श्री. वैभव चंद्रकांत निंबाळकर, IPS अधिकारी

"तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार" हा सद्गुरू श्री वामनराव पै यांचा एक अलौकिक सिध्दांत! या सिध्दांताचे अनुकरण करून आपल्या जीवनशिल्पास सुरेख आकार देणाऱ्या लाखो युवकांचे आदर्श ठरलात असे आपण श्री सद्गुरूंचे सर्वोत्तम शिष्य! आपण आहात परम मातृपितृभक्त आणि प्रखर राष्ट्रभक्त !

"जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी" या वचनाचा गर्भितार्थ श्री सद्गुरूंनी आपल्या प्रबोधनातून युवकांच्या मनावर बिंबविला आणि त्यांना राष्ट्राप्रती कृतज्ञता बाळगण्यास प्रवृत्त केले. अशाच एका प्रबोधनातून "तरूणांनी स्पर्धापरिक्षा उत्तीर्ण होऊन सनदी अधिकारी व्हाव" ही इच्छा श्री सद्गुरूंनी प्रगट केली. आपण सद्गुरूवचन शिरोधार्य मानून त्यादृष्टीने अथक प्रयत्न केले आणि पहिल्याच प्रयत्नांत UPSC परिक्षा उत्तीर्ण झालात. वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी IPS अधिकारी होण्याचा सन्मान प्राप्त केलात. श्री सद्गुरूंनी अनेकवेळा प्रवचनातून आपल्या या यशाचा गौरवास्पद उल्लेख केलेला आहे.

प्रशासकीय सेवेत दाखल झाल्यानंतर आपले पहिलेच कार्यक्षेत्र आसाम राज्य आहे हे समजल्यानंतर आपण त्याचा स्वखुशीने स्वीकार केला. आपण आपल्या कार्यक्षेत्रात आपले कर्तव्य बजावत असताना "आपल्या वाट्याला आलेले काम आवडीने, गोडीने आणि प्रामाणिकपणे करा", ही श्री सद्गुरूंची शिकवण अंमलात आणलीत. राष्ट्राची उन्नती व उत्कर्ष हे एकच ध्येय आपल्या डोळ्यासमोर सदैव असल्यामुळेच आपण आसामी भाषेचा तसेच आसामी जनतेच्या राहणीमानाचा सखोल अभ्यास करून तिथल्या संस्कृतीशी आपले ऋणानुबंध अधिकाधिक घट्ट करण्याचा प्रयत्न करीत राहिलात. आपल्या अंतःकरणात जीवनविद्येने शिकवलेल्या मानवी संस्कृतीची बीजे सुंदर रितीने परिपक्व झाल्याचाच हा प्रत्यय आहे.

"राष्ट्रप्रेम, राष्ट्रप्रगती, राष्ट्रशिस्त, राष्ट्रसंरक्षण व राष्ट्रकर्तव्य हे राष्ट्रीय जीवनाचे पंचशील आहेत" असे सांगणाऱ्या जीवनविद्येचे आपण निष्ठावंत पाईक आहात. आसाममधील अनेक आव्हानात्मक घटना आपण ज्या कौशल्याने हाताळल्यात त्यावरून आपल्या धाडसी आणि निर्भय वृत्तीचे दर्शनच घडले. अतिरेकी संघटना आणि दहशतवादाविरोधात आपण अचूक निर्णय घेऊन त्यांचा वेळीच बिमोड केलात. प्रसंगी समाजातील अघोरी रूढी, अंधश्रध्दा या विरोधात आपण केलेली कामगिरी ही आपल्या दृढ आत्मश्रध्देची द्योतक आहे. श्री सद्गुरूंना अभिप्रेत असलेल्या सामाजिक क्रांतीतील आपले योगदान स्पृहनीय आहे. अत्यंत अल्पावधीत आपल्या दैदीप्यमान कर्तृत्वाचा ठसा जनमानसावर उमटलेला दिसून येतो.

राष्ट्राचे प्राणपणाने संरक्षण करणाऱ्या तसेच राष्ट्रोन्नतीसाठी अहोरात्र झटणाऱ्या आपल्यासारख्या सर्वांप्रती जीवनविद्या मिशन नेहमीच कृतज्ञ आहे. आपले उत्तुंग व्यक्तिमत्व हे देशातील लाखो युवकांना स्वतःचे जीवनशिल्प उत्तमरितीने घडविण्यासाठी प्रोत्साहीत करेल हे निश्चित. हे सन्मानपत्र आपणास प्रदान करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. प्रशासकीय सेवेतील आपली भविष्यातील कामगिरी सर्वोत्कृष्ट होवो हीच सद्गुरूचरणी मनःपूर्वक प्रार्थना.

श्री. प्रल्हाद वामनराव पै
आजीव विश्वस्त, जीवनविद्या मिशन

# कठोर परिश्रमातून अशक्य गोष्टही शक्य

## डॉक्टर संजीव नाईक यांचा विद्यार्थ्यांना सल्ला

## जीवन विद्या मिशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन






■ नवी मुंबई, प्रतिनिधी

जीवन विद्या मिशन आणि Ambition Tutorial यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'उत्कर्ष विद्यार्थ्यांचा संकल्प जीवनविद्येचा' या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थी पालक यांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन आज करण्यात आले होते.

कार्यक्रमास माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर मनोगतात विद्यार्थी आणि पालक यांना मार्गदर्शन करताना आपल्या जीवनात यशस्वी होत असताना आपणास नशिबावर अवलंबून न राहता यश संपादन करण्यासाठी कठोर मेहनत आणि प्रामाणिक प्रयत्न केले तर आपणास कोणतीही गोष्ट अवघड नाही असे सांगितले. नाईक कुटुंबीय जीवन विद्या मिशन यांच्या कार्यक्रमांसाठी नेहमीच सर्वतोपरी सहकार्य करीत असून इथून पुढे देखील त्यांना सहकार्य करणार असल्याचे सांगितले. युवा पिढीला घडविण्याचे मोठे काम या मिशनच्या माध्यमातून सुरू असून हे राष्ट्र, ही तरुण पिढी चांगल्या विचारांनी बळकट करण्याचे काम आपल्या माध्यमातून चालत आहे आणि त्यास आमच्या शुभेच्छा कायम राहतील असे ते म्हणाले. या कार्यक्रमात विद्यार्थी व पालकांना अभ्यासाचे महत्त्व, अभ्यास कसा करावा अभ्यासाच्या अभिनव पद्धती आत्मविश्वास कसा वाढवावा.

जीवनात यशस्वी कसे व्हावे आपल्या जीवनात आई-वडील, शिक्षक यांचे असणारे महत्त्व मनाचे आणि विचाराचे सामर्थ्य यासारख्या विविध विषयावर प्रमुख वक्त्या सौ.अल्पना काळोखे व वैशाली राणे यांनी आपल्या विविध शैलीतून मुलांच्या आणि पालकांच्या मनातील भविष्याबद्दलच्या अनेक समस्या जाणून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन केले.

पालक आणि विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना या कार्यक्रमांमधून आम्हाला विविध प्रकारचे मार्गदर्शन मिळाल्यामुळे त्याचा फायदा विद्यार्थ्यांना भविष्यात आपले यश गाठण्यासाठी नक्कीच उपयोगी पडेल असे सांगितले व त्यांनी त्या सर्व कार्यक्रमाचे मोठ्या प्रमाणात कौतुक केले.

या कार्यक्रमास माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक, कल्पनाताई नाईक, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, माजी नगरसेविका वैजयंती भगत, जीवन विद्या नवी मुंबई मिशनचे प्रमुख कार्यकर्ते वंदना पठाडे, राजेंद्र देशमुख, मंगेश वालकर विजय नलावडे, जीवन विद्या मिशनचे सर्व युवा पदाधिकारी तसेच Ambitions Tutorialsचे प्रताप महाडिक सर, संतोष मोरे सर, प्रशांत महाडिक सर, अश्विनी महाडिक मॅडम, कमलेश मुळीक, शिवाजी राजिवडे, शुभांगी चिकणे, वासंती महाडिक, प्रमोद फडतरे, मंडलिक सर सर्व विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपण २०२२-२३ हे वर्ष सद्गुरूंचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करीत आहे. प्रत्येक कृती ही राष्ट्रहिताची विश्वशांतीची या ब्रीदवाक्यास अनुसरून जीवनविद्या मिशनने कोर्सेसच्या माध्यमातून पावले उचलायला सुरूवात केलेली आहे. जीवनविद्या मिशनचे विविध कोर्सेस विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणावर सुरू झालेले आहेत.

रविवार दिनांक २६ जून २०२२ रोजी सद्गुरू श्री वामनराव पै प्रणित उत्कर्ष विद्यार्थ्यांचा संकल्प जीवनविद्येचा या विद्यार्थी कोर्सचे तीन ठिकाणी आयोजन करण्यात आले होते.या तिन्ही ठिकाणी विद्यार्थी कोर्सला प्रचंड प्रतिसाद मिळाला. याचा तपशील खालीलप्रमाणे:-

1.विष्णुदास भावे नाट्यगृह नवी मुंबई
विद्यार्थी + पालक =1250

2.आचार्य अत्रे रंगमंदिर पिंपरी भोसरी पुणे
विद्यार्थी + पालक= 467

3. मालाड मुंबई
विद्यार्थी + पालक =165

यावरून लक्षात यैते की एकाच दिवसात आपण जवळपास 1900 नवीन लोकांपर्यंत जाण्यात यशस्वी झालो आहोत.या सर्व नवीन लोकांनी कोर्सनंतर अतिशय सुरेख प्रतिक्रिया दिल्या आहेत. इथून पुढेही जीवनविद्येशी जोडले राहू आणि कार्यात सहभागी होवू अशी त्यांनी ग्वाही दिली.

मा.श्री संजीव गणेश नाईक व त्यांच्या सौभाग्यवती सौ कल्पना नाईक यांच्या सौजन्याने विष्णुदास भावे नाट्यगृह नवी मुंबई येथील कोर्स संपन्न झाला. या कोर्सला Ambition Tutorials चे संस्थापक श्री प्रताप महाडिक सर यांचे विशेष सहकार्य लाभले.

आचार्य अत्रे रंगमंदिर पिंपरी भोसरी पुणे येथील कोर्सला याच विभागातील नगरसेवक श्री अमित गावडे यांचे सौजन्य लाभले.

मालाड येथील कोर्स मालाड शाखेच्या नामधारकांच्या सौजन्याने करण्यात आला या सर्वांचे जीवनविद्या मिशन शतशः ऋणी आहे.

या कोर्सेसला सौ.अल्पना काळोखे,सौ वैशाली राणे, सौ अस्मिता दाभाडे, सौ तेजस्विनी लाड, सौ आशा राणे, आणि सौ तृप्ती पराडकर या फॅकल्टी म्हणून लाभल्या. वैभवात नटलेल्या आणि ऐश्वर्यात पार पडलेल्या या दिव्य सोहळ्यात तनाने, मनाने आणि धनाने ज्यांचे ज्यांचे प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष हातभार लागले त्या सर्वांचे व नामधारकांचे कृतज्ञतापूर्वक आभार. विशेष कौतुक नवी मुंबई,पिंपरी भोसरी आणि मालाड शाखेच्या संपूर्ण युवा टीमचे ज्यांनी अतिशय सूत्रबद्धरित्या आणि नियोजनपूर्वक संपूर्ण कार्यक्रम पार पाडला.




रविवार दि.२६ जून २०२२ रोजी

महिंद्रा सीआयई ऑटोमोटिव्ह कंपनी लिमिटेड चाकण व जीवनविद्या फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामसमृद्धी अभियान अंतर्गत संयुक्त ग्रामपंचायत मांजरेवाडी येथील महिलांसाठी सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीनचे उदघाटन करण्यात आले. तसेच त्या अनुषंगाने "शरीर साक्षात परमेश्वर" या विषयावर महिलांना विशेष मार्गदर्शन करण्यात आले.

**जीवनविद्या मिशन, शाखा : पिंपरी - भोसरी**

लोकमत हॅलो रायगड

बुधवार, दि, २९ जून २०२२

## पालक व विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर संपन्न

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** विद्यार्थी व पालकांना अभ्यासाचे महत्त्व समजावे, अभ्यास कसा करावा, अभ्यासाच्या अभिनव पद्धती, आत्मविश्वास कसा वाढवावा याबाबत माहिती वाशीतील विष्णुदास भावे नाट्यगृहात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जीवन विद्या मशीन आणि अम्बिशन ट्युटोरियल यांच्या संयुक्त विद्यमाने 'उत्कर्ष विद्यार्थ्यांचा संकल्प जीवनविद्येचा' या कार्यक्रमाच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी कल्पना नाईक, माजी नगरसेवक दशरथ भगत, माजी नगरसेविका वैजयंती भगत, जीवन विद्या, नवी मुंबई मिशनचे प्रमुख कार्यकर्ते वंदना पठाडे, राजेंद्र देशमुख, मंगेश वालकर, विजय नलावडे, अम्बिशन्स ट्युटोरिअल्सचे प्रताप महाडिक, संतोष मोरे, प्रशांत महाडिक, अश्विनी महाडिक, कमलेश मुळीक, शिवाजी राजिवडे, शुभांगी चिकणे, वासंती महाडिक, प्रमोद फडतरे आदी मान्यवर विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### यशस्वी होण्याचा मार्ग

जीवनात यशस्वी कसे व्हावे आपल्या जीवनात आई, वडील, शिक्षक यांचे महत्त्व, मनाचे आणि विचाराचे सामर्थ्य यांसारख्या विविध विषयांवर प्रमुख वक्त्या अल्पना काळोखे व वैशाली राणे यांनी पालक आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

लोकमत हॅलो रत्नागिरी

बुधवार, दि. १३ जुलै २०२२

जीवनविद्या मिशनतर्फे पाचल परिसरातील शाळांमध्ये उपक्रम

## विद्यार्थ्यांना केले जीवनमूल्यांचे मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाचल :** मुंबईतील जीवनविद्या मिशनतर्फे ग्रामसमृद्धी अभियान आणि सद्‌गुरु वामनराव पै जन्म शताब्दी वर्षाअंतर्गत राजापूर तालुक्यातील पाचल परिसरातील शाळांमध्ये जीवन मूल्यांबाबत मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. पाऊस असूनही १२ शाळांमधील सुमारे १५०० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

पाचल पंचक्रोशीतील सरस्वती विद्यामंदिर पाचल, अर्जुना विद्यालय कारवली, शिवाजी विद्यालय नेरले, काळेश्वर विद्यालय मूर, तम्हाणे हायस्कूल, तुळसवडे हायस्कूल, रायपाटण हायस्कूल, सौंदळ हायस्कूल, येळवण हायस्कूल, जिल्हा परिषद शाळा पाचल नं. १, कारवली नं १, रायपाटण नं १, सरस्वती विद्यामंदिर छात्रालय या शाळांमधील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

ज्येष्ठ प्रबोधक व विश्वस्त शीतल गोरे, शाखेचे अध्यक्ष मधुसूदन अणेराव, ग्रामसमृद्धी अभियान समन्वयक नवनाथ हळदणकर, कोर्स फॅकल्टी व शाखा ग्राम समृद्धी अभियान प्रमुख आशा राणे, संस्कार शिक्षण अभियान फॅकल्टी निर्मिती हळदणकर, युवा नामधारक प्रसाद कालेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

जीवनविद्या मिशन पाचल येथे ग्रामसमृद्धी अभियान राबवित आहे. त्या अनुषंगाने आयोजित सभेमध्ये, येत्या वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती शीतल गोरे, आशा राणे यांनी दिली. यावेळी मधुसूदन अणेराव, नवनाथ हळदणकर, निर्मिती हळदणकर, प्रसाद कालेकर उपस्थित होते. तर पाचलच्या सरपंच अपेक्षा मासिये, उपसरपंच किशोर नारकर, सरस्वती विद्यामंदिरचे मुख्याध्यापक व सहकारी शिक्षक, पाचल उपकेंद्राचे सचिव मासिये, मनिषा बेंडे उपस्थित होते.

सरपंच अपेक्षा मासिये यांनी महिला बचत गटांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे, असे सांगितले. उपसरपंच किशोर नारकर यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी याबद्दलचे मार्गदर्शन आयोजित करावे, असे सांगितले. तसेच अकरावी, बारावी सायन्सच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे, अशी भावनाही काही शिक्षकांनी व्यक्त केली.

पाचल ग्रामपंचायत व ग्राम समृद्धी अभियान अंतर्गत पाचल पंचक्रोशीतील दहावी, बारावीत पहिल्या तीन क्रमांकाने उत्तीर्ण विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारुन त्यांना प्रोत्साहित केले.

### ऑनलाईन संस्कार शिक्षण अभियान

जीवनविद्या मिशन ही शैक्षणिक संस्था असून, सरकारची मार्गदर्शक सहकारी संस्था आहे. जीवनविद्या मिशन ग्रामसमृद्धी अभियान अंतर्गत ऑनलाईन पद्धतीने संस्कार शिक्षण अभियान राबवित आहे. सर्व शाळांनी यात सहभागी होण्याची तयारी दर्शविली. अशा प्रकारचे ज्ञान आजच्या स्पर्धात्मक वातावरणात खेड्यातील विद्यार्थ्यांना मिळणे आवश्यक आहे, असे मत उपस्थित शिक्षकांनी यावेळी व्यक्त केले.

- पाऊस असूनही पाचल परिसरातील १२ शाळांमधील सुमारे १५०० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
- बचत गटांना मार्गदर्शन करण्याची गरज असल्याचे सरपंच अपेक्षा मासिये यांनी सांगितले.
- जीवनविद्या मिशनतर्फे पाचल येथे ग्रामसमृद्धी अभियान राबवण्यात येत आहे.
- विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन करण्याची मागणी करण्यात आली.
- पाचल पंचक्रोशीतील दहावी, बारावीतील गुणवंतांचा बक्षीस देऊन गौरव करण्यात आला.

३. निसर्ग आपल्याला काय शिकवतो?

उत्तर - आ) आनंद वाटा आनंद लुटा

४. बहिर्मनाचा अंतर्मनावर प्रभाव कशामुळे पडतो?

उत्तर - ई) वरील पैकी सर्व




# Conference Call

२०१२ पासून दर आठवड्याला चार कॉन्फरंस कॉल सुरु आहेत.

प्रत्येक कॉलवर हजारो लॉग इन देश विदेशातून सहभाग.

२५,००० सहभागी.

संग्रह www.jeevanvidya.org/audiocall वर उपलब्ध । कॉन्फरन्स कॉल संग्रहाचा सर्वांनी लाभ घ्या

स्त्रियांनी केलेली क्रांती

वटपौर्णिमा, या दिवशी स्त्रिया वडाची पूजा करतात किंवा काही जणी वडाच्या झाडाची फांदी तोडून आणून घरी पूजा करतात. प्रत्येकीच्या भावना या सणाशी जोडल्या गेल्या आहेत. परंपरेने चालत आलेले सण म्हणजे अनुभवांची शिदोरीच जणू.

आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया अग्रेसर आहे. छत्रपती शिवाजी महाराजांवर गर्भात असल्यापासून संस्कार करणाऱ्या, छत्रपती शिवाजी महाराजांना घडवणाऱ्या जिजाऊ माता. मुलींची पहिला शाळा सुरू करणाऱ्या सावित्रीबाई फुले, ते अगदी आता अंतराळात जाण्यापासून ते सैनिक म्हणून सेवा देईपर्यंत प्रत्येक ठिकाणी स्त्रिया अग्रेसर आहेत. आपल्या पूर्वजांना नक्कीच माहीत होतं की एक स्त्री घराचं, देशाचं, जगाचं, विश्वाचं नंदनवन करू शकते.

वटपौर्णिमा हा दिवस तर असा दिवस आहे ज्या दिवशी प्रत्येक महिला विश्वात क्रांती करू शकते. आपण म्हणाल हे काय? कसली क्रांती? वटपौर्णिमा या दिवशी वडाची पूजा केली जाते. वडाचीच का? वडाचे झाड १००० वर्षांहून जास्त काळ जगू शकते आणि अशा या झाडाला प्रदक्षिणा घालून त्याच्याकडे स्त्रिया आपल्या पतीसाठी उदंड आयुष्य मागतात. मला हे सर्व सांगत असताना सद्गुरू श्री वामनराव पै यांचा एक अमृततुषार आठवतो “दृष्टी बदला म्हणजे सृष्टी बदलेल.” वटपौर्णिमेच्या दिवशी वडाच्या तोडलेल्या फांद्या विकत असताना आणि महिला त्या विकत घेत असताना मी पाहिलं आणि माझ्या डोळ्यात पाणी आलं. ज्या वडाच्या झाडाची पूजा करतात, उदंड आयुष्यासाठी त्याच्याकडे प्रार्थना करतात, त्याच झाडाला तोडून त्याच्या फांद्या अशा विकायला ठेवलेल्या बघून मन हादरून गेलं. मैत्रिणींनो दृष्टी बदलण्याची गरज आहे. आज आपण प्रत्येकीने या वृक्षाला, परमेश्वराला नवीन दृष्टीने बघण्याची गरज आहे. गेली दोन वर्षे कोरोनाने हाहा:कार माजवलेला होता. रुग्णांना ऑक्सिजन सिलेंडरही कमी पडत होते. काही लोकांचे लाखो रुपये गेले पण आपल्या माणसाला वाचवू नाही शकले.

निसर्गाने, परमेश्वराने आपल्याकडून एक रुपयाही घेतला नाही, घेत नाही आणि घेणार नाही. या विश्वातील प्रत्येक झाड आपल्या प्रत्येकाला विनामूल्य ऑक्सिजन देऊन जगवत आहे. पण आज 'झाडे लावा झाडे जगवा' असे ओरडून ओरडून सांगावं लागतंय. भारत देशात जवळजवळ लाखो स्त्रिया आहेत आणि सर्व स्त्रियांनी दरवर्षी वटपौर्णिमेनिमित्त एक झाड लावायचं ठरवलं तर दरवर्षी लाखो झाडं लावली जातील. 'प्रदूषणविरहित भारत' ही सर्व स्त्रियांनी केलेली क्रांती असेल. आतापर्यंत जेव्हा जेव्हा सावित्रीबाई फुलेंसारख्या क्रांतिकारी महिलांनी समाजात बदल घडवून आणायचा प्रयत्न केला, तेव्हा त्याला विरोध झाला. त्यांना खूप काही सहन करावे लागले. पण तरिही त्यांनी जिद्दीने क्रांती केली. आज त्यांच्यामुळे आपण मानाने जगत आहोत, शिकत आहोत, सर्व क्षेत्रात टॉपला आहोत. आपण सर्वांनी दरवर्षी वटपौर्णिमेनिमित्त लावलेल्या झाडांमुळे 'प्रदूषण विरहित भारत' ही क्रांती होईल आणि युगानुयुगे या क्रांतीमुळे 'प्रदूषण विरहित विश्व' निर्माण होईल.

**अजिता निलेश घाडी**, महावीर नगर
७९७७७९९७०३

# पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षरोपण, संवर्धन गरजेचे

## राहुल पाटील : जीवनविद्या मिशन, ग्रीन हिल्स ग्रुप, वनविभाग, लोकमतमार्फत ७२०० वृक्षांचे रोपण

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास थांबविण्यासाठी वृक्षारोपण करणे आणि वृक्षसंवर्धन करणे, हे दोन्ही गरजेचे आहे. त्याकरिता शासन कायम आग्रही असते आणि शासनाकडून हवे असलेले सहकार्य कायम मिळेल, असे प्रतिपादन उपवनसंरक्षक राहुल पाटील यांनी केले.

जीवनविद्या मिशन, ग्रीन हिल्स ग्रुप, पुणे वनविभाग आणि लोकमत यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी पुण्यातील नऱ्हे येथील स्वामी नारायण मंदिर परिसरात ७ हजार २०० वृक्षांच्या रोपणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. यावेळी पुणे वनपरिक्षेत्र अधिकारी मुकेश सणस, आसाम विशेष सतर्कता आणि लाचलुचपत प्रतिबंधक



जीवनविद्या मिशनच्या तळेगाव, मिरज, कोल्हापूर, पुणे शाखेत रविवारी वृक्षारोपण करण्यात आले. जीवनविद्या मिशन अंतर्गत ग्रामसमृद्धी अभियानाद्वारे दत्तक गावात मलघेवाडी येथेही वृक्षारोपण करण्यात आले.

विभागाचे पोलीस अधिकारी वैभव निंबाळकर, संस्थेचे विश्वस्त गिरीश सुकाळे, संतोष तोत्रे, संतोष सावंत, पंकज नाईक, सुनील नेरूळकर, तुषार राणे, परशुराम राणे, ग्रीन हिल्स ग्रुपचे अध्यक्ष संजय सूर्यवंशी, संजय आठवले, श्रीरंग देडगे उपस्थित होते.

जीवनविद्या मिशनचे आजीव विश्वस्त प्रल्हाद वामनराव पै यांच्या ७२ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून प्रल्हाद पै यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमायाची सुरुवात झाली.

समपातळी चर करून डोंगरावरचे पाणी अडविणे, जमिनीखालील पाण्याची पातळी वाढविणे, मातीचे पुनर्निमाण करणे अशा पद्धतीचे अनेक फायदे या चरांमुळे होत असल्याचे संस्थेच्या माध्यमातून सांगण्यात आले.

सदगुरू श्री वामनराव पै प्रणीत पर्यावरण हाच नारायण या सिद्धांताने हा कार्यक्रम अधोरेखित केला होता. सदगुरूंच्या जन्मशताब्दी वर्षात हे कार्यक्रम वेगवेगळ्या शाखांत आयोजित करण्यात येत आहेत.

पर्यावरणाची जोपासना हीच परमेश्वराची उपासना या सदगुरु श्री वामनराव पै यांच्या दिव्य सिद्धांताने प्रेरित होऊन सद्गुरुंच्या जन्मशताब्दी वर्षातर्गत पर्यावरण संवर्धन व्हावे व या पर्यावरणरूपी विठ्ठलाची, नारायणाची उपासना व्हावी या उद्देशाने जीवनविद्या मिशन पुणे शाखेतील नामधारक कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. नऱ्हे येथील स्वामी नारायण मंदिरामागे वनविभागांतर्गत असलेल्या टेकडीवर हे वृक्षारोपण करण्यात आले.

---

जीवनविद्या मिशन चेंबूर शाखा व स्वच्छता अभियान समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २४ जून २०२२ शुक्रवार रोजी सायंकाळी ७:०० वाजता नेहमीच्या साप्ताहिक सत्संग कार्यक्रमाच्या जागेत जनरल एज्युकेशन अकॅडमी हायस्कूल चेंबूर पूर्व, मुंबई येथे घनकचरा व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. चेंबूर घाटकोपर विभागातील पर्यावरण क्षेत्रातील तळमळीचे तज्ञ कार्यकर्ते व्याख्याते नामधारक श्री संजूजी रामचंद्र काळे यांचे सर्व उपस्थित नामधारकांना फार सुंदर मार्गदर्शन लाभले. त्यांनी त्यांच्या खुमासदार शैलीत घनकचरा व्यवस्थापनाच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन केले. त्यामुळे श्रोत्यांमध्ये कमालीचे उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. श्रोत्यांच्या प्रश्नांना संजू जी काळे सरांनी दिलेल्या उत्तराने सर्वांचे समाधान झाले. सदर कचरा व्यवस्थापन विषयाची व्याप्ती मोठी असल्याने काहींनी अशा प्रकारचे मार्गदर्शन पुन्हा देण्यात यावे असे सुचविले.

उपरोक्त व्याख्यान ऐकण्यासाठी एकूण ६० हून अधिक नामधारक बंधु-भगिनी हजर होते आणि श्री प्रमोद जी रासम, जीविमि अनुभवी विश्वस्त व सल्लागार (स्वच्छता व अवयवदान समिती) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. विशेष म्हणजे विद्यार्थी सुद्धा उपस्थित होते. उपस्थित पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

आभार प्रदर्शन व विश्वप्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली. स्वच्छता समिती प्रमुख श्री सुदर्शन कामुनी यांनी घरातल्या प्लास्टिक बास्केटमध्ये



किचनच्या ओला कचऱ्यापासून सेंद्रिय खत तयार करण्याबाबतचे माहिती पत्रके सर्व उपस्थितांना वाटली व खतासाठी आतून नायलॉन जाळी लावलेले प्लास्टिक बास्केट उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. त्यासाठी इच्छुक व्यक्तींनी नावे द्यावी अशी विनंती केली.

श्री सदगुरू कृपेने वरील घनकचरा व्यवस्थापनाबाबतचा व्याख्यानाचा कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला.

**सुदर्शन कामुनी**
जीवनविद्या मिशन स्वच्छता अभियान समिती



लोकमत
हॅलो रायगड
बुधवार, दि. ६ जुलै २०२२

## जीवनविद्याचे 'ग्राम समृद्धी मिशन'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कर्जत :** सद्गुरू श्री वामनराव पै प्रणीत जीवनविद्या मिशन ही शैक्षणिक, सामाजिक व सेवाभावी संस्था आहे. समाजाचा उत्कर्ष आणि उन्नतीचा उद्देश ठेवून समाज उपयुक्त विविध अभियान राबवत आहे. जीवनविद्या मिशनचा हीरक महोत्सव व सद्गुरू वामनराव पै जन्मशताब्दी वर्षानिमित्त जीवनविद्या मिशनचे विश्वस्त श्री प्रल्हाद पै यांच्या नेतृत्वाखाली गावोगावी ग्राम समृद्धी अभियान राबविले जात आहे. या उपक्रमांतर्गत गाव पर्यावरणस्नेही, स्वच्छ पाणी, व्यवस्थापन, बाल, युवा संस्कार आदींबाबत मार्गदर्शन केले जात आहे.



वैजनाथ गावातील ग्राम समृद्धी अभियानामध्ये सहभागी झालेले कार्यकर्ते.

जीवनविद्या मिशन दादर शाखेने २५ जून रोजी कर्जत वैजनाथ गावात जाऊन ग्राम समृद्धी अभियानाचा शुभारंभ केला. दादर शाखेचे नामधारक, जीवनविद्या मिशन, ग्राम समृद्धी अभियानाचे विश्वस्त आनंद राणे, नवनाथ हळदणकर, मधुकर सर्वोदय, वैजनाथ गावाचे सरपंच स्नेहल सुरेश गुरव, शिक्षिका बोराडे मॅडम, केंद्रप्रमुख नारायण सोनावणे तसेच दादर शाखेचे कार्यकर्ते मिलिंद डिचोलकर, सुजीत धावडे, शांताराम भोवड, जीवनविद्येचे अनेक कार्यकर्ते, सर्व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत हा अभियानाचा शुभारंभ सोहळा पार पडला. तद्नंतर ग्रामपंचायत ऑफिस, सर्व ग्रामपंचायत समिती, सदस्य, सरपंच, ग्रामस्थ मंडळी यांना ग्राम समृद्धी योजनेचे उद्दिष्ट सांगून आनंद राणे यांनी मार्गदर्शन केले. तसेच या गावाचा येणाऱ्या ३ वर्षांत कायापालट होणारच, असा विश्वास आनंद राणे यांनी व्यक्त केला.

## मीरा रोडमध्ये विश्वप्रार्थना फलकाचे अनावरण



प्रतिनिधी
■ भाईंदर

जीवन विद्या मिशनच्या मीरारोड शाखेच्या सौजन्याने पेणकर पाडा भागातील नताशा पार्क जवळील मंदिराच्या परिसरात सदगुरू श्री वामनराव पै निर्मित विश्वप्रार्थना फलकाचे अनावरण जीवनविद्या फाऊंडेशनच्या विश्वस्त शितल गोरे यांच्या हस्ते करण्यात आले. सदगुरू जन्म शताब्दीच्या औचीत्याने नगरसेविका सुरेखा सोनार यांच्या प्रयत्नातून झालेल्या या कार्यक्रमाला माजी आमदार नरेंद्र मेहता, नगरसेवक मोहन म्हात्रे, नगरसेविका अनिता पाटील, वीणा भोईर उपस्थित होते. तसेच संस्थेच्या मीरारोड शाखेचे अध्यक्ष डॉ. जनार्दन घुगे, सुशील चव्हाण, शरद सावंत,मनिषा म्हात्रे, गणेश सातवसे,जगन्नाथ गार्डे व इतर पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते. मीरारोड परिसरात विश्वप्रार्थनाचे सहा फलक लावण्यात येणार असल्याची माहिती सुरेखा सोनार यांनी दिली आहे.

## Nature

Do you know that there are trees only on earth? That is amazing! Right?
Why dont other planets have life? And why we need oxygen to leave?
These are the questions in my mind .Did you ever think of it?
And have you ever kept watching the sea for hours and hours and lost in the music of the waves?
I do. Sitting in a garden and experiencing the quality time with nature, the sound of birds, shipping and the cold gentle breeze hit's your face and you feel blessed.

Name: Arushi Avinash Bolke
Shakha:Goa, td:7

## संस्कार गीत -

उत्कर्षाच्या सात पायऱ्या चढूनिया जाशी ।
संस्कारांचे जोडूनी नाते जीवनविद्येशी ।धृ।
जगण्यासाठी कष्ट करावे स्वभाव देहाचा ।
कर्तव्याची जाण ठेवणे धर्म माणसाचा ।
कल्पकता आणि कौशल्याचे नाते ज्ञानाशी । १॥
स्फुर्ती मनाला देती सच्चे बोल कौतुकाचे ।
विज्ञानाचे देणे टिकविल लेणे करूणेचे ।
कृतज्ञतेचा भाव जपूनी गरुडझेप घेशी । २॥
उत्कर्षासह उन्नतीने प्रगती साधावी ।
शक्तीयुक्तीचा योग जुळवून मुक्ती मिळवावी ।
क्रांतीयुगाची ललकारी रे उठेल या देशी । ३॥

- अनिता सुनील मोरे



थोर समाजसुधारक, तत्त्वज्ञ
सद्गुरु श्री. वामनराव पै

उजळती ज्ञानाच्या ज्योती, वेचिता जीवनविद्येचे संस्कारमोती
श्री प्रल्हाद वामनराव पै लिखित आगामी पुस्तक
"जीवनविद्येचे १०८ संस्कारमोती"



श्री. प्रल्हाद वामनराव पै
B.TECH(IIT, POWAI) MAM, TQM(JAPAN)



सद्गुरू श्री वामनराव पै



श्री. प्रल्हाद वामनराव पै

## ॥ विश्वप्रार्थना ॥

"हे ईश्वरा,
सर्वांना चांगली बुध्दी दे, आरोग्य दे,
सर्वांना सुखात, आनंदात, ऐश्वर्यात ठेव,
सर्वांचे भलं कर, कल्याण कर, रक्षण कर,
आणि तुझे गोड नाम मुखात
अखंड राहू दे"

सद्गुरु श्री. वामनराव पै.

१९२३ - २०२३

सद्गुरू श्री वामनराव पै

# प्रत्येक कृती ही
# राष्ट्रहिताची, विश्वशांतीची